# आपला धर्म

## [ नीति व नागरिकत्व यांसह ]

[ इयत्ता ५–६–७ करितां ]



लेखक व संग्राहक

पोदर विठ्ठल फफे

IRBK-0104057




म. ग्रं. सं. वाचनालय, ठा.
विषय आ. बा.
दा. क्र. ८०५७०

# आपला धर्म

## [ नीति व नागरिकत्व ह्यांसह ]

[ मराठी इयत्ता ५-६-७ व इंग्रजी इयत्ता १-२-३ ह्यांकरितां ]


लेखक व संग्राहक

**दामोदर विठ्ठल फफे**



राज्य ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 25985
विभाग का.वा.
क्रमांक 9957
नों. दि. 3/3/65

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
8057 नों. दि



केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई



IRBK-0104057

IRBK-0104057


मूल्य दहा आणे

[ सर्व हक्क स्वाधीन ]

पहिली आवृत्ति : १९४२
दुसरी आवृत्ति : १९५२

मुद्रक : वा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

# निवेदन

,५म क. ५ (८) नुसार

. . . पस जादा वर्गणी भरावी लागेल. एक

. . . ; धार्मिक शि . . . स्वतंत्र स्थान नाहीं. ह्यामुळें प्राथमिक अभ्यासक्रम संपवून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचें धर्मविषयक शिक्षण जसें व्हावयास पाहिजे तसें झालेलें नसतें. हा प्रकार इष्ट नसल्यामुळें ह्याकडे विचारी लोकांचें लक्ष वेधून गेलें आहे ही खरोखर समाधानाची गोष्ट होय.

हल्लीं महाराष्ट्रांत कांहीं जिल्ह्यांत स्थानिक संस्थांनीं प्राथमिक शाळांतून धार्मिक शिक्षण सुरू केलेलें आहे. कांहीं शाळांतून ह्या धर्मशिक्षणाशिवाय नीतिशिक्षणही दिलें जातें. हें धार्मिक व नीतिविषयक शिक्षण जितकें शुद्ध आणि विस्तृत पायावर दिलें जाईल तितकें तें परिणामीं हितकारक होईल, हें उघड आहे. 'नुसत्या धार्मिक गोष्टी सांगणें अगर धर्मविषयक कांहीं पाठान्तर करणें' हेंच खरोखर धर्मशिक्षण होय असें म्हणतां यावयाचें नाहीं! धर्म म्हणजे काय व त्याचा किती दूरवर संबंध पोहोंचतो ह्याची स्पष्ट कल्पना विद्यार्थ्यांना आली पाहिजे.

नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें मुलांना इतिहासाबरोबरच 'नागरिकशास्त्राचा परिचय' करून द्यावयाचा आहे. बालवर्ग व पहिली ह्या इयत्तांकरितां 'रामायण – महाभारतांतील गोष्टी' सांगावयाच्या असून पांचव्या इयत्तेला 'आर्यांची माहिती' अगदीं प्राचीनकालापासून शिकवावयाची आहे. ही माहिती शिकवितांना आर्यांच्या 'धर्म, नीति व नागरिकत्व' ह्यांविषयींच्या उत्क्रान्त होत गेलेल्या कल्पनांना हात न लावणें अपरिहार्य आहे. तेव्हां हा हेतु साध्य होईल अशाच प्रकारें धर्मशिक्षण दिलें गेलें पाहिजे ह्यांत शंका नाहीं.

'आपला धर्म' ह्या पुस्तकांत हीच दृष्टि ठेविलेली आहे. चौथ्या इयत्तेपर्यंत 'धार्मिक गोष्टी सांगण्यांत येऊन पाठान्तरही झालें आहे' असें गृहीत धरून इयत्ता ५ ते ७ च्या मुलांना योग्य अशी रचना ह्या पुस्तकांत केली आहे ह्या तीन इयत्तांकरितां ह्या पुस्तकांत तीन स्वतंत्र खंड केले आहेत व प्रत्येक खंडांत प्रारंभीं धर्मविषयक चर्चा केली असून शेवटीं पाठान्तराकरितां योग्य

तो पद्यभाग दिला आहे. शिक्षकानें एकएक पाठ वाचून घ्यावा व त्याचा जरूर तितका विस्तार करावा. विद्यार्थ्यांना स्वतःच्या बुद्धीनेंही ह्या पुस्तकाचा अभ्यास करितां येईल. अशा प्रकारें ह्या पुस्तकाचा योग्य उपयोग केल्यास 'आदर्श नागरिक' व 'जागतिक धर्म' ह्या केंद्राकडे विद्यार्थी आपोआपच जाऊन पोहोंचतील असें वाटतें.

प्रयत्न केला आहे; तो सिद्धीस नेणें परमेश्वराच्या अधीन आहे. ह्या माझ्या प्रयत्नाला माझे व्यवसायबंधु व स्थानिक संस्था प्रोत्साहन देतील अशी आशा आहे. शेवटीं, ह्या पुस्तकांत ज्यांचीं गीतें घेतलीं आहेत त्यांचेबद्दल कृतज्ञता दर्शवून हें निवेदन पुरें करितों.

लेखक

विजयादशमी, शक १८६४

# अनुक्रमणिका


## [ खंड पहिला ]

१ आपली ओळख ७
२ वेद व स्मृति ८
३ पुराणें व इतिहास ९
४ श्रीमद्भगवद्गीता १०
५ शंकराचार्य ११
६ साधु व संत १३
७ जयन्ती व पुण्यतिथि १४
८ उत्सव १५
९ सण व व्रतें १७
१० दिनचर्या १८
११ धर्मबांधव व देशबांधव १९
१२ धर्माची शिकवण २०
पाठांतर २२–२६

## [ खंड दुसरा ]

१ बाल्यावस्था २७
२ धर्मरक्षणाचें एक साधन २८
३ शरीराचें सामर्थ्य कसें मिळवितां येईल ? २९
४ आपलें मन ३१
५ मनाचें सामर्थ्य ३१
६ पुराणें व इतिहास ह्यांचा धर्माशीं संबंध ३२
७ आदर्श नागरिक ३४
८ प्रपंच व धर्म ३५
९ सत्य, प्रेम व अहिंसा ३७
१० मनुष्याचें शील ३९
११ दया आणि परोपकार ४०
१२ गीतेचा संदेश ४१
पाठांतर ४३–४९

## [ खंड तिसरा ]

१ विषयप्रवेश ५१
२ मनुष्याचा विशेषपणा ५२
३ बुद्धीचा उपयोग ५३
४ शोध व त्यांचे प्रकार ५४
५ शोधांचा उपयोग ५५
६ मनुष्याचें ध्येय ५६
७ व्यक्ति व समाज ५८
८ धर्म व नीति ५९
९ संस्कृति म्हणजे काय ? ६०
१० हिंदु संस्कृतीचा इतिहास ६१
११ हिंदु संस्कृतीचा इतर धर्माशीं आलेला संबंध ६४
१२ आजचा हिंदुधर्म ६४
पाठांतर ६७–७२

# आपला धर्म

अनुक्रम ९८९
विभाग ब
क्रमांक १२५
नों. दि. ३१
ग्रंथालय

## खंड पहिला

### १

**आपली ओळख**—आपण हिंदुस्थानांत राहातों; आपला धर्म **हिंदुधर्म** होय. आपण आपल्या **धर्मावर** व **देशावर** प्रेम करितों. आपण आपल्या **राम, कृष्ण** वगैरे देवांना पूज्य मानितों आणि आपल्या देशांतील **गंगा, गोदा** वगैरे नद्या आणि **हिमालया**सारखे पर्वत ह्यांना पवित्र मानितों. आपल्याला आपली, आपल्या धर्माची व देशाची चांगली ओळख झालेली असली पाहिजे.

फार प्राचीन काळीं म्हणजे इसवी सनाच्या पूर्वी कित्येक वर्षे हिंदुस्थानच्या वायव्येकडून कोणी लोक ह्या देशांत आले. हे लोक वर्णानें गोरे असून सुधारलेले होते. ते आपल्याला '**आर्य**' असें म्हणत. त्या काळीं हिंदुस्थानांत जे मूळचे लोक होते ते असे सुधारलेले नव्हते. ह्या मूळच्या लोकांना हे आर्य लोक '**अनार्य**' असें म्हणत.

आर्य लोक अगदीं प्रारंभीं सिंधुनदाच्या कांठच्या प्रदेशांत वसाहत करून होते; नंतर ते **गंगा नदी**पर्यंत पसरले. पुढें त्यांनीं सर्व उत्तर हिंदुस्थान व्यापून नंतर ते दक्षिण हिंदुस्थानांत उतरले. त्यांच्या व अनार्यांच्या पुष्कळ लढाया झाल्या. तेव्हां कित्येक अनार्य ठार झाले, कित्येक शरण आले व कांहीं डोंगरांत पळून गेले.

आर्य लोक चांगलेच सुधारलेले होते. ते **शेती** करीत व **गायी, बैल** वगैरे पाळीत. **अग्नि, वरुण, सूर्य, वायु** वगैरेंना ते देव मानीत व त्यांना प्रसन्न करून घेण्यासाठीं ते त्यांच्या स्तुतीचे मंत्र म्हणत. ह्या

मंत्रांनाच पुढें '**वेद्**' असें नांव पडलें. आर्य लोक **यज्ञ**ही करीत. यज्ञांनीं देव प्रसन्न होतात अशी त्यांची कल्पना असे.



हेच आर्य आपले पूर्वज होत. प्रथम हे 'सिंधु' नदाच्या कांठावर राहात म्हणून त्यांना '**सिंधु**' ह्या शब्दावरून '**हिंदु**' हें नांव पडलें असणें शक्य आहे. ह्याप्रमाणेंच आर्यांच्या धर्माला 'हिंदुधर्म' व त्यांच्या देशाला 'हिंदुस्थान' असें नांव पडलें.

## २

**वेद व स्मृति**—आर्य लोकांनीं देवांच्या स्तुतीकरितां जे मंत्र म्हटले त्या मंत्रांचेच पुढें **वेद** बनले. हे वेद त्या काळच्या आर्यांच्या भाषेंत आहेत. वेद चार आहेत: (१) **ऋग्वेद**, (२) **यजुर्वेद**, (३) **सामवेद** व (४) **अथर्ववेद**. देवांनीं सांगितले व ऋषींनीं ऐकिले म्हणून वेदांना '**श्रुति**' असेंही म्हणतात. वेद पाठ करावे लागत. पुढें लेखनकलेचा शोध लागल्यानंतर **वेदग्रंथ लिहून** ठेवण्याची पद्धति सुरू झाली पण ह्या कामीं ताडपत्रांचा उपयोग करीत असत; कारण त्या काळीं कागद

नव्हता ! हे वेदग्रंथ हिंदु लोक प्रमाण मानीत म्हणून हिंदुधर्माला '**वैदिक धर्म**' असेंही म्हणतात.

आर्यांचीं **कुळें** असत; प्रत्येक कुळांत एक मुख्य पुरुष असे, त्याच्या आज्ञा त्या कुळांतील सर्वजण मानीत. आर्यांचे '**संघ**' किंवा '**समाज**' असत. प्रत्येक संघांत थोर विचारी पुरुष असत, ते आर्यांचे आचार-विषयक नियम ठरवीत. हे नियम त्या काळीं लक्षांत ठेवावे लागत, म्हणून त्यांना '**स्मृति**' असें नांव आहे. ह्या स्मृति निरनिराळ्या काळांत तयार झाल्या. '**मनुस्मृति**', '**याज्ञवल्क्यस्मृति**', '**देवलस्मृति**' असे एकंदर १०८ स्मृतिग्रंथ आहेत.

**वेद** व **स्मृति** हे आर्यांचे मूळ ग्रंथ होत; हिंदु लोक ह्या ग्रंथांना प्रमाणग्रंथ म्हणून मान देतात.

३

**पुराणें** व **इतिहास**—हिंदुस्थानांत सुमारें तीन हजार वर्षांपूर्वी '**पुराणें**' व '**इतिहास**' ह्यांची रचना झाली. मुख्य पुराणें अठरा आहेत व '**रामायण**' आणि '**महाभारत**' असे दोन इतिहासग्रंथ आहेत. अठरा पुराणांपैकीं कांहींचीं नांवें पुढीलप्रमाणें दिसून येतात.

( १ ) **मत्स्य**, ( २ ) **मार्कंडेय**, ( ३ ) **भविष्य**, ( ४ ) **भागवत**, ( ५ ) **गरुड**, ( ६ ) **पद्म**, इत्यादि. ह्यांपैकीं भागवतपुराण फार लोकप्रिय झालेलें दिसून येतें.

इतिहासग्रंथांपैकीं रामायणाची रचना '**वाल्मीकि**' मुनीनें व महाभारताची रचना '**व्यास**' महर्षींनीं केली. हे ग्रंथ संस्कृत भाषेंत आहेत. रामायणामध्यें रघुकुलाची हकीकत असून भारतामध्यें कुरुवंशाची हकीकत आहे. रामायणाचीं सात '**काण्डें**' व भारताचीं अठरा '**पर्वें**' म्हणजे **भाग** आहेत.

**रामायण** व **महाभारत** ह्यांत सुंदर कथा आहेत. ह्या कथांवर भास, कालीदास, भवभूति, माघ वगैरे कवींनीं प्राचीन काळीं सुंदर

काव्यें अगर नाटकें संस्कृत भाषेंत लिहिलीं आहेत. तसेंच श्रीधर, वामन, मोरोपंत ह्या कवींनीं व एकनाथ, मुक्तेश्वर वगैरे **संतांनीं** ह्या दोन्ही ग्रंथांतील कथाभाग काव्यरूपानें मराठींत रचिले आहेत.

हिंदुस्थानांतील गुजराथी, हिंदी वगैरे भाषांतूनही रामायण व महाभारत ह्यांतील कथाभाग काव्यरूपानें झालेले आहेत. **तुलसीदासाचें 'हिंदी' रामायण** फार प्रसिद्ध आहे. अशा प्रकारें रामायण व महाभारत हे ग्रंथ सर्व हिंदुधर्मीयांना फार प्राचीन काळापासून 'धार्मिक' ग्रंथ म्हणून प्रिय झालेले आहेत.

४

**श्रीमद्भगवद्गीता — कौरव** व **पांडव** हे एकमेकांचे चुलत भाऊ होत. पांडवांमध्यें '**धर्म**' हा सर्वांत ज्येष्ठ व कौरवांमध्यें '**दुर्योधन**' हा ज्येष्ठ होय. पांडव कौरवांशीं 'फाशांचा जुगार' खेळले व त्यांत पांडव आपल्या राज्याचा पण लावून हरल्यामुळें त्यांचें हस्तिनापुरचें सर्व राज्य कौरवांना मिळालें! ह्या जुगारामुळें पांडवांना बारा वर्षें '**वनवास**' व एक वर्ष '**अज्ञातवास**' भोगावा लागला!

पांडव अज्ञातवासानंतर योग्य दिवशीं प्रकट झाले. त्यांनीं आपलें राज्य कौरवांजवळ परत मागितलें, पण कौरव कबूल झाले नाहींत! **विदुर, नारद, भीष्म, कृष्ण,** ह्यांनीं पुष्कळ सांगून पाहिलें, पण कौरवांनीं त्यांचें मुळींच ऐकिलें नाहीं! शेवटीं गोष्ट युद्धावर आली.

युद्धासाठीं कौरव-पांडवांचीं मोठीं सैन्यें समोरासमोर उभीं राहिलीं. अर्जुनाच्या रथावर **श्रीकृष्ण सारथि** होता. त्यानें अर्जुनाला समोर कौरवांच्या सैन्यांत कोणकोण आहेत तें दुरून दाखविलें. राज्य मिळविण्यासाठीं आपले भाऊ, नातेवाईक व गुरु **भीष्म - द्रोण** ह्यांचा नाश आपल्या हातून होणार हें पाहून अर्जुन खिन्न झाला. तो युद्धाला तयार होईना! तेव्हां श्रीकृष्णानें त्याला उपदेश करून '**युद्ध हा क्षत्रियांचा धर्म आहे**' असें सांगितलें. अर्जुनानें अनेक प्रश्न विचारिले व कृष्णानें त्याचें

समाधान केलें. **गीता म्हणजे श्रीकृष्ण व अर्जुन ह्यांचा हा संवाद होय.**



गीतेचे एकंदर अठरा **अध्याय** आहेत. प्रत्येक धर्मशील हिंदु गीता-भक्त असतो. कोणी कोणी गीतेचें पठण रोज थोडेंतरी करितात. विशेषतः बारावा किंवा पंधरावा अध्याय नेमानें वाचितात. **गीता संस्कृत भाषेंत** आहे. तिचा अर्थ मराठींत स्पष्ट करण्यासाठीं ज्ञानेश्वरानें ओंवीबद्ध '**ज्ञानेश्वरी**' लिहिली. शंकराचार्यांनीं '**गीताभाष्य**' लिहिलें, पण तें संस्कृतांत आहे. लो० टिळकांनीं गीतेचा अर्थ स्पष्ट होण्यासाठीं '**गीतारहस्य**' हा प्रचंड ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ मराठींत असल्यानें गीतेचा अर्थ सर्वांना सुगम होऊन गेला आहे. **वेद, स्मृति, पुराणें** व **इतिहास** ह्याप्रमाणेंच **गीता** हा आपला धार्मिक ग्रंथच होय.

५

**शंकराचार्य—शंकराचार्यांचा** जन्म मलबार प्रांतांत इ. स. ७७८ मध्यें झाला. प्राचीन काळीं हिंदुधर्माचा उद्धार करणारी शंकराचार्य ही थोर विभूति होय. आचार्य फार विद्वान होते. त्यांनीं **संन्यास** घेतला

होता व संन्यासी राहून त्यांनीं 'हिंदुधर्माचा उत्कर्ष करण्याची कामगिरी पार पाडिली.

आचार्यांच्या काळीं हिंदुस्थानांत **बौद्ध**धर्माचा प्रसार फार झाला होता व वैदिक म्हणजे वेदांना प्रमाण मानणारा हिंदुधर्म मागें पडत चालला होता. आचार्यांनीं बौद्ध पंडितांना धर्मविषयक वादामध्यें जिंकलें व बौद्धधर्म हिंदुधर्माचेंच एक स्वरूप आहे असें सिद्ध करून दाखविलें. हें कार्य त्यांनीं केल्यामुळें हिंदुधर्माचा उत्कर्ष पुन्हा होऊं लागला. आचार्यांनीं **उपनिषद्भाष्य, गीताभाष्य** व **ब्रह्मसूत्र भाष्य** हे मोठे ग्रंथ लिहिले आहेत.



आचार्य सर्व हिंदुस्थानांत प्रमुख ठिकाणीं हिंडले. हिंदुधर्माच्या रक्षणासाठीं हिंदुस्थानच्या चार दिशांना त्यांनीं चार **मठ** स्थापन केले. (१) उत्तरेस **बद्रीकेदार,** (२) पश्चिमेस **द्वारका,** (३) पूर्वेस **जगन्नाथपुरी** व (४) दक्षिणेस **शृंगेरी**. ह्या चार मठांवर शंकराचार्यांची शिष्यपरंपरा चालू असते. हे **शिष्यस्वामी** आपआपल्या अधिकाराच्या क्षेत्रांत मधूनमधून संचाराला जातात व धार्मिक बाबतींतील वादांचा निकाल देतात.

शंकराचार्यांनीं आपल्या वयाच्या बत्तिसाव्या वर्षीं हिमालयांत आपली अवतारसमाप्ति केली. ह्या आद्य **शंकराचार्यांची जयन्ती** [ जन्मदिवस ] दरवर्षीं **वैशाख शु० १०** रोजीं साजरी करितात.

६

**साधु** व **संत**—प्राचीन व अर्वाचीन काळीं हिंदुस्थानांत अनेक भागांत **साधु** व **संत** होऊन गेले. संतांप्रमाणेंच कांहीं **संतिणीसुद्धां** होऊन गेल्या. महाराष्ट्रांतील साधुसंतांमध्यें **ज्ञानेश्वर**, **मुक्तेश्वर**,







**एकनाथ**, **नामदेव**, **तुकाराम**, **रामदास**, **चोखामेळा** वगैरे फार प्रसिद्ध प्रसिद्ध साधुसंत, आणि **मुक्ताबाई**, **जनाबाई**, ह्या प्रसिद्ध संतिणी होऊन गेल्या. गुजराथी संत **नरसिंह मेहेता** आणि हिंदी संत **तुलसीदास** व संतीण **मिराबाई** हीं महाराष्ट्रीयांस माहीतच आहेत.

ज्ञानेश्वर, रामदास वगैरे कांहीं साधुसंत संसारांत पडलेच नाहींत; तुकाराम, चोखामेळा, एकनाथ वगैरे कांहीं संत मात्र संसारी होते; पण संसारांत ह्यांचें खरें लक्ष कधींच नसे! **सर्वच संत देवाचे भक्त**

**होते.** ते नामसंकीर्तन करीत. सर्वांनींच थोडीबहुत कविता केलेली आहे. कांहींनीं तर **रामायण, महाभारत, भागवत** ह्या ग्रंथांतील कथाभागांवर कवितांचीं आख्यानें केलेलीं आहेत. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, श्रीधर, ह्यांनीं ह्या कथांवर स्वतंत्र ग्रंथरचना केली आहे; ह्यांपैकीं कांहीं ग्रंथांचीं नांवें आपल्याला माहीत असलीं पाहिजेत.

(१) ज्ञानेश्वर — ज्ञानेश्वरी, अमृतानुभव.

(२) मुक्तेश्वर — ओंवीबद्ध भारत, भागवत.

(३) श्रीधर — रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत, जैमिनी अश्वमेध.

(४) रामदास — दासबोध.

हे सर्व ग्रंथ कित्येक हिंदु नेमानें वाचितात. साधुसंतांचे अभंग, पदें वगैरे भजनांत म्हणतात. ह्यांपैकीं कांहीं साधुसंतांच्या पुण्यतिथीही साजऱ्या करितात.

## ७

**जयन्ती व पुण्यतिथि — पंचांग** म्हणजे काय हें तुम्हांला माहीत आहे का? रोजची **तिथि, वार, नक्षत्र, योग** व **करण** अशा पांच गोष्टींची म्हणजे अंगांची माहिती ज्यांत दिलेली असते, त्याला पंचांग म्हणतात. पंचांगांत **बारा महिने,** प्रत्येक महिन्यांत **दोन पक्ष** व प्रत्येक पक्षांत **पंधरा तिथि** असतात. पंचांग कसें पाहावें तें वडील मंडळीपासून समजावून घेतलें पाहिजे. पंचांगाचा पुढील संक्षिप्त नमुना पाहा.

### शके १८६४ चित्रभानुनाम, भाद्रपद शुक्लपक्ष

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | शुक्र. | उत्तरा | शुभ | किं. | |
| २ | शनि. | हस्त | शुक्ल | बा. | चंद्रदर्शन |
| ३ | रवि. | चित्रा | ब्रह्म | तै. | हरतालिका ३ |
| ४ | सोम. | स्वाती | ऐंद्र | वि. | श्रीगणेश ४ |

पंचांगांत प्रत्येक तिथीच्या समोर आंखलेल्या कोष्टकांच्या बाहेर बरीच माहिती दिलेली असते. ही माहिती पाहिली असतां तिच्यांत **'जयन्ती'** व **'पुण्यतिथि'** लिहिलेल्या दिसून येतात. जयन्ती म्हणजे **'जन्मदिवस'** व पुण्यतिथि म्हणजे **मृत्युदिवस** होत. देवादिकांच्या जयन्ती साजऱ्या करितात. (कां बरें?) साधुसंतांच्या बहुशः पुण्यतिथि मानितात. कांहीं **ऐतिहासिक** व **राष्ट्रीय** पुरुषांच्या जयन्ती व पुण्यतिथीही साजऱ्या करितात. मात्र राष्ट्रीय पुरुष जिवंत असेल तर त्याची फक्त जयन्ती साजरी करितात हें उघडच आहे.

**श्रीराम, मारुति, परशुराम, कृष्ण, दत्त** ह्यांना आपण देव मानतों व त्यांची जयन्ती साजरी करितों. आद्य **शंकराचार्य** व **राजा शिवाजी** ह्यांचीहि जयन्ती साजरी करितों. **रामदास, तुकाराम, मोरया गोसावी** वगैरे साधुसंतांच्या पुण्यतिथि साजऱ्या करितों. **म. गांधी, लो. टिळक** ह्यांची जयन्ती करितों. लो० टिळकांची पुण्यतिथीहि साजरी करितों. (कां बरें?)

जयन्ती व पुण्यतिथि ह्या जरूर साजऱ्या केल्या पाहिजेत. कारण ह्यांमुळें **देव, साधुसंत** व **राष्ट्रीय** पुरुष ह्यांच्याबद्दल आपली आदरबुद्धि पुन्हा जागी होत असते व आपणही त्यांच्याचप्रमाणें वागून **धर्म** व **देश** ह्यांच्या रक्षणाचें कार्य केलें पाहिजे असें वाटूं लागतें.

## ८.

**उत्सव**—हिंदुधर्मांत जयन्ती आणि पुण्यतिथि साजऱ्या करितात, त्याप्रमाणें कांहीं निरनिराळे **उत्सव**ही साजरे केले जातात. लहान-सहान उत्सव प्रत्येक महिन्यांत असतात. मोठे उत्सव मधून मधून येतात. ह्या मोठ्या उत्सवांची माहिती आपल्याला असली पाहिजे.

**चैत्र** महिन्यांत **वसंत** ऋतु असतो, झाडांना नवीन पालवी फुटलेली असते, सृष्टिदेवता ह्या वेळीं नटलेली असते! ह्याप्रमाणें वसंतऋतूचें

आगमन सर्वांना आनन्ददायक झालेलें असतें. ह्याच वेळीं '**वसन्तोत्सव**' करितात. वसन्तोत्सवाप्रमाणें **वसन्तगौरी**ही चैत्रामध्येंच असतात. चैत्रामध्यें स्त्रियांचे हळदीकुंकू-समारंभ असतात हें तुमच्या लक्षांत असेलच.

**ज्येष्ठ** महिन्यांत पावसाला सुरुवात झालेली असते; **नद्या** नवीन पाण्यानें भरूं लागतात; अशा वेळीं नदीचा उत्सव असणें साहजिकच होय. आपण **गंगा** नदी फार पवित्र मानितों. ह्या **गंगेचा उत्सव** ज्येष्ठ महिन्यांत पहिले दहा दिवस असतो. ह्यालाच '**गंगोत्सव**' म्हणतात. ह्या उत्सवाचें माहात्म्य उत्तर हिंदुस्थानांत विशेषच आहे.

**आश्विन** महिन्यांत पावसाळा संपून नवीन धान्य तयार झालेलें



असतें, ह्या वेळीं **लक्ष्मी** व **सरस्वती** ह्यांचे-विषयीं अधिक प्रेम वाटणें साहजिक आहे; म्हणून आश्विन महि-न्यांत पहिले नऊ दिवस



**शारदेचा उत्सव** करितात. ह्याच महिन्यांत शेवटीं धनत्रयोदशीला व लक्ष्मीपूजनाचे दिवशीं **लक्ष्मीची** पूजा करावयाची असते.



ह्या उत्सवांशिवाय '**गौरी-गणपती**' व '**होलिका**' ह्यांचे मोठे उत्सव सर्वांना माहीत आहेतच. हे सर्व उत्सव कांहींतरी कथेवर आधारलेले असून त्यांचा संबंध धर्माशीं जोडून ठेवण्यांत आलेला आहे. ह्या उत्सवांच्या **कथा** व त्यांतील **तत्त्व** आपण समजावून घेतलें पाहिजे.

९

**सण** व **व्रतें**—हिंदुधर्मामध्यें अनेक **सण** आहेत; ह्या सणांचा हेतु काय असावा बरें? आपण रोज रोज कष्ट करितों त्यामुळें आपल्या मनाला व शरीराला फार शीण येतो. सणाचे दिवशीं विश्रान्ति मिळते हें तर खरेंच, शिवाय त्यामुळें आपल्या **धार्मिक भावना** पुन्हा पुन्हा जागृत होत असतात.

**गुढीपाडवा, गणपति, दसरा, दिवाळी** वगैरे कितीतरी सण हिंदुधर्मांत आहेत; ह्यांपैकीं कोणताही सण घेतला तरी त्याच्या मुळाशीं कांहींतरी (१) **धार्मिक** कथा किंवा (२) **पवित्र भावना** असतात. '**ध्व ज व न्द न म्**' म्हणतांच वर्षाचा पहिला दिवस व ध्वजाचें पावित्र्य ह्या गोष्टी डोळ्यांसमोर येतात, तर '**बलिप्रतिपदा**' म्हणतांच बलिराजाची कथा लक्षांत येते. प्राचीन काळीं आपल्या देशांत धार्मिक म्हणून ज्या चांगल्या गोष्टी घडल्या त्यांची आठवण ह्या **सणांमुळेंच** होत असते ही दृष्टि ठेवून आपण आपल्या सणांचा इतिहास अगर त्यांची मूळ कल्पना समजावून घेतली पाहिजे.

आपल्या धर्मांत सणांप्रमाणेंच कांहीं '**व्रतें**' आहेत. **सावित्रीव्रत, गजगौरीव्रत, कोकिलाव्रत** वगैरे व्रतें कित्येक हिंदु स्त्रिया आचरितात. प्रत्येक व्रताला आपल्या धार्मिक ग्रंथांत आधार आहे. कोणतें व्रत कोणीं व कां आचरिलें ही माहिती आपल्या धार्मिक ग्रंथांवरून कळते. ही माहिती मिळविली तर व्रतांच्या थोर हेतूंची कल्पना आपल्याला बरोबर येईल.

धर्म कोणता कां असेना, प्रत्येक धर्मांत सण हे आहेतच. अमका धर्म अगर त्यांतील सण हे बरे अगर वाईट हा प्रश्नच येथें येऊं शकत नाहीं. आपापल्या **धर्मावर विश्वास** ठेवून सणांचें आचरण करणें व दुसऱ्याच्या सणांविषयीं अनादरबुद्धि न ठेवणें हें विचारी मनुष्याचें काम आहे.

## १०

**दिनचर्या**—सृष्टीमध्यें आपल्याला प्रत्येक गोष्ट नियमाप्रमाणें घडलेली दिसून येते. **सूर्यचंद्रादि** गोल नियमाप्रमाणें उगवतात व मावळतात; वसंत, ग्रीष्म, वर्षा वगैरे सर्व **ऋतु** नियमानें येतात; **वारे** सुद्धां नियमानें वाहातात! तर मग **मनुष्याच्या** वागणुकींत नियम नको का?

आपली रोजची वागणूक अगदीं ठरलेली असली पाहिजे. ह्या ठरविलेल्या वागणुकीला '**दिनचर्या**' असें म्हणतात. आपली दिनचर्या एकदा ठरविल्यानंतर त्याप्रमाणेंच आपण वागलें पाहिजे. '**व्यवहार**' व '**धर्म**' ह्या दोन्ही गोष्टी लक्षांत ठेवून आपण आपली दिनचर्या ठरविण्याचा प्रयत्न करून पाहूं या.

अनेक दृष्टींनीं **प्रभातकाल** हा सर्वांत महत्त्वाचा आहे. ह्याच कालांत **पक्षीगण** उठतात व आपल्या किलबिल शब्दांनीं सर्व जगाला जागें करितात! **गो-मातेला** प्रेमाचा पान्हा ह्याच वेळीं फुटतो! **अरुणोदय** झालेला असतो आणि पूर्वेच्या बाजूला 'तांबडें' फुटूं लागलेलें असतें. **सर्व सृष्टीला जिवंतपणा आणणारा हा प्रभातकाल** खरोखरच मंगलकाल होय.

ह्या प्रभातकालीं प्रत्येकानें नियमानें उठून '**मुखमार्जन**' वगैरे कृत्यें करून शरीराला शुद्धता आणावी. नंतर एकादी '**भूपाळी**' म्हणून '**प्रातःस्मरणाचे श्लोक**' म्हणावे. **देव, माता** व **पिता** ह्यांना वन्दन करावें. नंतर आपल्या **गुरुदेवतेचें** मनांत स्मरण करून वन्दन करावें. पुढें '**स्नान**' व '**साष्टांग नमस्कार**' हीं कृत्यें आटोपून '**देवपूजा**' करावी किंवा '**देवदर्शन**' करून यावें. इतक्या कार्यक्रमाला एक तासापेक्षां जास्त वेळ लागणार नाहीं. ह्यानंतरचा सर्व वेळ आपापल्या व्यवसायाला मोकळाच आहे.

संध्याकाळीं पुन्हा देवाची '**प्रार्थना**' करावी; आपल्याला येत असलेली '**आरती**' देवासमोर म्हणावी; साधुसंतांचे दोन चार **अभंग** प्रेमानें म्हणावे आणि भोजन वगैरे झाल्यानंतर शेवटीं रात्रीं शान्त मनानें देवाचें नांव घेऊन झोपीं जावें.

दिनचर्येचा हा एक नमुना झाला. ह्यांत आपल्या वडील मंडळींच्या मताप्रमाणें जरूर तो फरक करून आपली दिनचर्या प्रत्येकानें ठरवावी.

## ११

**धर्मबांधव व देशबांधव—हिंदु लोक** हे **आर्यांचे वंशज** आहेत असें आपण मागें पाहिलेंच आहे. प्राचीन काळीं आर्यांच्या वसाहती हिंदुस्थानच्या सर्व भागांत झाल्यामुळें हिंदु लोक हिंदुस्थानांत सर्वत्र पसरलेले दिसून येतात.

हिंदुस्थानांत **हिंदूं**शिवाय **पारशी, मुसलमान, जैन, बौद्ध, शीख** व **ख्रिस्ती** ह्या धर्मांचेही लोक आज कित्येक वर्षें नांदत आहेत; **इराणांतून** प्राचीन काळीं आपल्या देशांत अग्निपूजक पारशी धर्माचे लोक आले. **इराण-अफगाणिस्तान** ह्या मार्गानें आलेल्या मुसलमान लोकांनीं तर ह्या देशांत राजसत्ता उपभोगिली आहे. जैन, बौद्ध व शीख हे धर्म तर ह्याच देशांत उदयाला आले.

हिंदु लोक हिंदुस्थानांत सर्वत्र पसरलेले आहेत. महाराष्ट्रांतील **मराठे**, गुजराथेंतील **गुजराथी**, कर्नाटकांतील **कानडी**, मध्यहिंदुस्थानांतील **रजपूत**, काश्मीरमधील **काश्मिरी**, बंगालमधील **बंगाली**, मारवाडांतील **मारवाडी** व आसाममधील **आसामी**, इत्यादि सर्व लोक हिंदुधर्मीच असल्यामुळें ते आपले '**धर्मबांधव**' आहेत. पंजाबमधील **शीख**, नेपाळमधील **गुरखे** व सर्व हिंदुस्थानांतील **मुसलमान** व **ख्रिस्ती** हे सर्व आपले '**देशबांधव**' आहेत.

भाऊ भावावर प्रेम करितो व त्याला साह्य करितो. सर्व भाऊ एकमतानें वागून आपल्या कुळाचा लौकिक वाढवितात; तर मग हिंदुस्थानांतील सर्व धर्मबांधवांनीं व देशबांधवांनीं ह्याचप्रमाणें वागावयाला नको काय? ह्यासाठीं **सर्वांवर प्रेम करा, सलोख्यानें वागा,** कोणताही धर्म तुम्हांला ह्याच गोष्टीचा आदेश देईल.

## १२

**धर्माची शिकवण**—जगांतील सर्व लोकांचा धर्म एकच नाहीं. निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या देशांत निरनिराळे धर्म उदयाला आले. **येशू ख्रिस्तानें** ख्रिस्ती धर्म, **महंमद पैगंबरानें** मुसलमानी धर्म, **झरतुष्ट्रानें** पारशी धर्म, **गौतम बुद्धानें** बौद्धधर्म, गुरु **नानकानें** शीखधर्म व **महावीरानें** जैनधर्म उपदेशिला. हिंदुधर्म ह्या सर्वांच्या आधींचा असून तो आर्यधर्माचेंच स्वरूप आहे असें आपण मागें पाहिलेंच आहे.

धर्म कोणता कां असेना, प्रत्येकाचीं मुख्य तत्त्वें साधारणपणें सारखींच असतात. **देव एक** आहे, त्याचेवर विश्वास ठेवा असेंच प्रत्येक धर्म सांगतो, मन ताब्यांत ठेवा व चांगला विचार करा अशीच प्रत्येक धर्माची आज्ञा आहे. प्रेम करा असाच प्रत्येक धर्माचा संदेश आहे. आचरण शुद्ध ठेवा व गोड बोला अशीच प्रत्येक धर्माची शिकवण आहे. ह्यालाच **सर्व धर्मांची एकवाक्यता** असें म्हणतात.

हिंदुधर्माची शिकवण **वेद, स्मृति, पुराणें, इतिहास** व **गीता** ह्या ग्रंथांवरून स्पष्टपणें कळून येते. हीच शिकवण पुढें **साधुसंत** व **थोर राष्ट्रीय पुरुष** ह्यांनीं स्वतःच्या वर्तनानें व उपदेशानें अधिक स्पष्ट केली. आपले धार्मिक ग्रंथ व आपले साधुसंत ह्यांची शिकवण साररूपानें पुढीलप्रमाणें सांगतां येईल—

" **स्वधर्मानें** वागा; **देवावर** विश्वास ठेवा; आपलें **कर्तव्य** करा; तुम्हांला जें कांहीं मिळेल त्याचा अंश भक्तीपूर्वक **परमेश्वराला अर्पण** करा; प्राणिमात्रांवर **दया** करा; **सत्य, प्रेम, क्षमा** ह्यांसारखे सत्त्वगुण मिळवा; म्हणजे परमेश्वर तुमची सर्व प्रकारची काळजी घेईल. "

आपल्या हिंदुधर्माची शिकवण ही अशा प्रकारची आहे. ह्या शिकवणीप्रमाणें वागण्याची बुद्धि परमेश्वरानें आपल्याला द्यावी म्हणून आपण त्याची **प्रार्थना** करूं या.

**सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो।**
**कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो॥**
**सदंघ्रिकमळीं दडो, मुरडितां हटानें अडो।**
**वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो॥**

**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः**

ठाणे, वाचनालय
८०.५

# पाठान्तर

## (१)

## भूपाळी-गंगेची

उठोनियां प्रातःकाळीं। वदनीं वदा चंद्रमौळी॥
श्रीबिंदुमाधवाजवळी। स्नान करा गंगेचें (गोदेचें)॥ ध्रु०॥
स्नानदान जया अंतरीं। घडेल भागिरथीच्या तीरीं॥
हरि कृपा करिल त्यावरी। ऐसें महात्म्य गंगेचें (गोदेचें)॥ १॥
भागिरथीचें स्नान करा। हृदयीं स्मरा गंगाधरा॥
चुकेल चोऱ्यायशींचा फेरा। ऐसें महात्म्य गंगेचें॥ २॥
गंगा आहे स्वर्गावरती। पाताळीं ते भोगावती॥
मृत्युलोकीं हे विख्याती। ऐसें महात्म्य गंगेचें॥ ३॥
कृष्णा वेण्या तुंगभद्रा। शरयू कालिंदी नर्मदा॥
भीमा भामा मुख्य गोदा। करा स्नान गंगेचें॥ ४॥
व्यास वाल्मीकि नारदमुनी। अत्रि वशिष्ठ आणि जैमिनी॥
गुरुदत्त येती माध्यान्हीं। ऐसें महात्म्य गंगेचें॥ ५॥
आली आषाढी एकादशी। चला जाऊं पंढरीसी॥
पांडुरंगचरणापाशीं। दावी महात्म्य गंगेचें॥ ६॥

## (२)

## प्रातःस्मरण

कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती।
करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम्॥ १॥
वक्रतुंड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥ २॥
विनायकं गुरुं भानुं ब्रह्मविष्णुमहेश्वरान्।
सरस्वतीं प्रणौम्यादौ सर्वकार्यार्थसिद्धये॥ ३॥
पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः।
पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः॥ ४॥

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च विभीषणः ।
कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ॥ ५ ॥
अहल्या द्रौपदी सीता तारा मन्दोदरी तथा ।
पंचकं ना स्मरेन्नित्यं महापातकनाशनम् ॥ ६ ॥
अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥ ७ ॥
मंगलं भगवान्विष्णुर्मंगलं गरुडध्वजः ।
मंगलं पुंडरीकाक्षो मंगलायतनं हरिः ॥ ८ ॥
लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः ।
येषामिंदीवरश्यामो हृदयस्थो जनार्दनः ॥ ९ ॥
कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।
प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः ॥ १० ॥

(३)

## दशक १२ वा

### समास १ ला – विमललक्षणनाम ( संक्षेप करून )

आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका ।
येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १ ॥
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ।
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥ २ ॥
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ३ ॥
परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी ।
अंतीं परम कष्टी होसी । यमयातना भोगितां ॥ ४ ॥
संसारीं असतांच मुक्त । तोचि जाणावा संयुक्त ।
अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे ॥ ५ ॥
प्रपंचीं जो सावधान । तोचि परमार्थ करील जाण ।
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थीं खोटा ॥ ६ ॥
म्हणोनि सावधानपणें । प्रपंच परमार्थ चालविणें ।
ऐसें न करितां भोगणें । नाना दुःखें ॥ ७ ॥

पर्णाळी पाहोन उचलें । जीवसृष्टी विवेकें चाले ।
आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावें ॥ ८ ॥
म्हणोनि असावी दीर्घसूचना । अखंड करावी चाळणा ।
पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें ॥ ९ ॥
सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर ।
ऐसा हा लौकिक विचार । दिसतचि आहे ॥ १० ॥
म्हणोन सर्व सावधान । धन्य तयाचें महिमान
जनीं राखे समाधान । तोचि एक ॥ ११ ॥
चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला ।
ते वेळे सावरायाला । अवकाश कैंचा ॥ १२ ॥
म्हणोन दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पहावा विवेक ।
लोकांकरितांचि लोक । शाहाणे होती ॥ १३ ॥
परी ते शहाणे वोळखावे । गुणवंतांचे गुण घ्यावे ।
अवगुण देखोन सांडावे । जनामध्यें ॥ १४ ॥
मनुष्य पारखूं राहेना । आणि कोणाचें मन तोडीना ।
मनुष्यमात्र अनुमाना । जाणून पाहे ॥ १५ ॥
दिसे सकळांस सारिखा । पाहतां विवेकी नेटका ।
कामी निकामी लोकां । बरें जाणे ॥ १६ ॥
जाणोन पाहिजेत सर्व । हेंचि तयाचें अपूर्व ।
ज्याचें त्यापरी गौरव । राखों जाणे ॥ १७ ॥

(४)

## गीता — अध्याय १२ वा

### भक्तियोगो नाम

अर्जुन उवाच—एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥
श्रीभगवानुवाच—मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥
ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥

संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥
क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥
ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥ ६ ॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥
मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥
अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥
अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥
अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥
श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥ १२ ॥
अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥
संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥
यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १५ ॥
अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १६ ॥
यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान् यः स मे प्रियः ॥ १७ ॥
समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥ १८ ॥

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥
ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्धधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ २० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ।

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

(५)

## आरती–विठ्ठलाची



युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिकाचे भेटीं परब्रह्म आलें गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥ जय देव जय देव जय पांडुरंगा । रखुमाई-वल्लभा राईच्या वल्लभा पावें जिवलगा । जय देव० ॥ ध्रु० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेउनि कटीं । कांसे पीतांबर कस्तुरी लल्लाटीं । देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढें उभे रहाती ॥ २ ॥ धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ! सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां । राईरखुमाबाई राणीया सकळा । ओंवाळिती राजा विठोबा सांवळा ॥ ३ ॥ ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती । चंद्रभागेमाजी सोडुनियां देती । दिंड्यापताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमाजी स्नानें जे करिती । दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती । केशवासी नामदेव भावें ओंवाळिती ॥ जय देव० ॥ ५ ॥

# आपला धर्म

---

## खंड दुसरा

### १

**बाल्यावस्था** — प्राणिमात्राला **बाल्य, तारुण्य** आणि **वार्धक्य** अशा तीन अवस्था असतात. ह्यांपैकीं 'बाल्य' ही अवस्था पुढील आयुष्याचा पाया होय. ह्याच अवस्थेंत आपली पूर्व तयारी व्हावयाची असते; म्हणून कोणत्याही शिक्षणाला हा काळ अत्यंत महत्त्वाचा होय. ह्याच काळांत चांगल्या अगर वाईट **संवयी** लागून मनुष्याचा कांहींएक **स्वभाव** बनत असतो.

ह्या अवस्थेंत विचार फार कोते असतात व त्यामुळें कर्तव्याची जाणीव झालेली नसते. ह्यासाठीं आपलीं **वडील माणसें** व **गुरु** जें सांगतील तें ऐकलें पाहिजे. ह्या वयांत वडील माणसें प्रेमानें मार्गदर्शन करीत असतात. मुलांनीं आपली आज्ञा ऐकावी, प्रेमानें वागावें, सर्वांचा आदर बाळगावा, खरें बोलावें, अशा प्रकारचीच त्यांची इच्छा असते. ही इच्छा जीं मुलें पूर्ण करितात, तीं पुढें सुस्वभावी झालेलीं दिसून येतात.

**धर्म** व **नीति** ह्यांच्या संस्काराला **बाल्यावस्था** हा काळ योग्य होय. ह्या काळांत कोंवळ्या मनावर जे कांहीं बरे व वाईट **संस्कार** होतील तेच पुढें कायम राहातात. म्हणून ह्या काळांत चांगलीं **पुस्तकें** वाचलीं पाहिजेत, चांगले **खेळगडी** निवडले पाहिजेत, व **जें जें कांहीं चांगलें** म्हणून सांगितलें जाईल त्याची आवड उत्पन्न झाली पाहिजे.

आज आपल्याला आपल्या देशांत जे थोर पुरुष दिसून येतात, ते एके काळीं लहानच होते. **शिवाजीमहाराजांना** आपण थोर पुरुष

समजतों; त्यांचें बालपण कसें गेलें होतें? **जिजाबाई** व **दादोजी** ह्यांच्या आज्ञेंत ते राहिले व त्यांच्या सर्व गुणांचा विकास झाला. **महात्मा गांधी**





व **लो० टिळक** ह्यांनाही त्यांच्या बालपणांत चांगल्या संवयी लाविल्या गेल्या व ते पुढें थोरपणाला चढले. अशा **थोर पुरुषांचीं चरित्रें** आपण हौसेनें वाचून आपल्या मनाचा विकास आपण केला पाहिजे.

## २

**धर्मरक्षणाचें एक साधन**—'**शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्**' असें एक वचन आहे. ह्या वचनावरून '**शरीर** हेंच खरोखर **धर्माचें साधन** आहे' ही गोष्ट स्पष्ट होते. कारण उघडच आहे कीं शरीर चांगलें असल्यावांचून धर्माचें आचरण आपल्या हातून योग्य प्रकारें होणार नाहीं. शरीराच्या चांगल्या स्थितीवर मनाची चांगली स्थिति अवलंबून असते. **चांगल्या शरीरांत चांगलें मन** राहातें व कार्य करण्याची इच्छाशक्ति मनाच्या ठिकाणींच असते. दुबळ्या शरीरांतील दुबळ्या मनाला धर्माचें परिपालन कसें बरें करितां येईल?

लहानपणीं आपलें शरीर सारखें वाढत जातें; हा सृष्टीचा क्रम आहे. पण ह्या बाबतींत सृष्टीचे जे कांहीं नियम आहेत त्यांस अनुसरून वागलें पाहिजे, नाहीं तर शरीर दुर्बल होऊन जाईल. शरीराच्या **सामर्थ्याविषयीं** आपल्याला **प्रेम** व **अभिमान** वाटला पाहिजे.

आपलीं **पुराणें** व **इतिहास** ह्यांतील गोष्टींवरून धर्माचें रक्षण व शरीराचें सामर्थ्य ह्यांचा फार मोठा संबंध दिसून येतो. **भीमानें** दुष्ट कौरवांचा नाश केला, तर **मारुतिरायानें** राक्षसांचा संहार केला! मारुतिरायाला तर आपण अनेक कारणांनीं 'देव' मानितों व त्याचे-करितां देवालयें बांधून त्याची भक्तिभावानें पूजा करितों ह्यांतील हेतु काय असावा बरें ?

**शिवाजीमहाराजांनीं** हिंदुधर्माचें रक्षण केलें असें आपण म्हणतों. **परधर्मांत जाण्यापेक्षां मृत्यु बरा** असें म्हणणाऱ्या संभाजीचा आपण अभिमान बाळगतों. ह्या पितापुत्रांना धर्मरक्षणाच्या कामीं मदत करणारे मावळे तरी कसे होते ? त्यांचे पिळदार दंड, भरदार छाती व सिंहासारखी गर्दन हीं आपलें मन आकर्षण करून घेतात! **शरीर-शक्तीशिवाय पराक्रम नाहीं आणि पराक्रमाशिवाय धर्मरक्षण नाहीं,** असें जर आहे तर आपल्यालाही शरीराचें सामर्थ्य मिळवावयाला नको काय ?

## ३


**शरीराचें सामर्थ्य कसें मिळवितां येईल ?**— आपल्या धर्मांत **'काय खावें व काय प्यावें'** ह्याबद्दल कांहीं निर्बंध आहेत. धर्मानें कांहीं कांहीं पदार्थ वर्ज्य सांगितले आहेत. खाद्य व पेय पदार्थांचे गुण-दोष लक्षांत घेऊनच ह्या गोष्टी ठरविण्यांत आल्या आहेत व त्यांचा मेळ आरोग्यशास्त्राशीं बरोबर बसतो असें दिसून येतें.

आपल्या धर्मानें कांहीं दिवस **उपवासाचे** म्हणून सांगितले आहेत. मोठ्या माणसांनीं गुरुवारीं व शनिवारीं फक्त एकदा जेवावें, एकादशीचे दिवशीं **निरशन** करावें! निरशन म्हणजे कांहींही न खाणें. पण आपण एकादशीचे दिवशीं **'निरशन' म्हणून जो फराळ** करितों, त्याचा

विचार करून पाहा, म्हणजे खरी एकादशी व निरशन म्हणजे काय हें आपणांस कळलेंच नाहीं असें दिसून येईल.

'**अन्न हें अमृत आहे**' असें आपण नेहमीं ऐकतों. चांगली कडकडीत भूक लागल्यानंतर अन्न हें खरोखरच अमृतासारखें लागतें ह्याचा अनुभव प्रत्यक्ष येण्यासारखा आहे; पण आपण भुकेपूर्वींच जेवतों व भुकेपेक्षां जास्त जेवतों ! तेव्हां आपल्याला हा अनुभवं कसा येणार ? **पचनेंद्रियांना विश्रान्ति** मिळाली पाहिजे असें आरोग्यशास्त्र सांगतें. एकादा दिवस 'निरशन' केल्यामुळें हा हेतु साध्य होतो. मादक पदार्थांचें सेवन **आरोग्यशास्त्र** व **धर्म** ह्यांनीं वर्ज्य म्हणून सांगितलें आहे. अशा रीतीनें आरोग्याच्या दृष्टीनें आपल्या खाण्यापिण्याचा संबंध आपल्या धर्माशीं जोडण्यांत आला आहे.

सूर्याला प्रभातकालीं साष्टांग **नमस्कार** घालावे, निदान एकाद्या



पर्वणीला नदीवर अगर समुद्रावर जाऊन **स्नानविधि** करावा, अष्टमीचे दिवशीं **गिरीवर आरोहण** करावें असें आपला धर्म सांगतो. ह्या गोष्टींचा संबंध आपल्या **व्यायामाशीं**च असला पाहिजे, नव्हे का ? रोज **प्राणायाम** व निरनिराळीं **आसनें** करणें हें **धर्म** व **आरोग्य** ह्या दोन्ही तऱ्हांनीं फार महत्त्वाचें आहे. आपण आपल्या ह्या धार्मिक आचारांकडे योग्य प्रकारें पाहाण्याची संवय मात्र लावून घेतली पाहिजे.

अशा प्रकारें शुद्ध **आहार** व योग्य **विहार** ह्यांच्या योगानें आपल्याला शरीर-सामर्थ्य मिळवितां येईल व ह्या सामर्थ्याचा उपयोग **धर्माचरण** व **धर्मरक्षण** ह्यांचेसाठीं आपल्याला करितां येईल.

४

**आपलें मन**—परमेश्वरानें मनुष्यमात्राला **डोळे, नाक, कान, जीभ** व **त्वचा** अशीं पांच **ज्ञानेंद्रियें** दिलीं आहेत. ह्या पांच ज्ञानेंद्रियांवर ताबा ठेवण्याचें काम '**मन**' करितें. कोणी कोणी ह्या मनाला सहावें इंद्रिय समजतात. चांगलें काय अगर वाईट काय हें ठरविण्याचें काम ह्या मनाकडेच असतें.

मनुष्याला चांगल्या गोष्टी करण्यापासून दूर करण्याचें कार्य **काम, क्रोध, लोभ, मोह, मद** व **मत्सर** हे विकार करितात. ह्या सहा विकारांना '**सहा शत्रु**' म्हणतात! मनावर ह्या सहा विकारांचा परिणाम होतो म्हणून तें **विकारी** आहे, व ह्या विकारांना झुगारून देऊन तें विचार करितें म्हणून तें **विचारी**ही आहे!

शरीराला जसें सामर्थ्य असतें तसें ह्या मनालाही सामर्थ्य असतें. मनाच्या सामर्थ्यावर अनेक वस्तु अवलंबून असतात. ह्या बलावांचून **विद्या** नाहीं, **धैर्य** नाहीं इतकेंच काय, तर मनुष्याला **मनुष्यपणा**ही नाहीं! **मनुष्यपणाचें खरें मापन म्हणजे त्याचें 'विचारी मन'** हेंच होय. जे ज्ञानी असतात त्यांचें मन सहज विजयी होतें; परंतु अज्ञानी मनुष्यांचीं—विशेषतः बालकांचीं—मनें दुर्बल असतात.

शरीराप्रमाणेंच **मनाचें सामर्थ्य मिळवावें** लागतें. ह्या दोन बलांच्या योगानें धर्माच्या पायावर उभें राहून मनुष्य काय करूं शकणार नाहीं? प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धां त्याला वश करून घेतां येईल, मग जग वश होईल हें काय सांगावयास पाहिजे?

५

**मनाचें सामर्थ्य**—**मन** हें फार चंचल आहे ह्यांत शंकाच नाहीं. तें क्षणभरसुद्धां एके ठिकाणीं स्थिर राहूं शकत नाहीं! आपण कांहीं वाचावयाला अगर विचार करावयाला सुरुवात केली कीं तें धावलेंच

कोठें तरी ! मग आपल्याला गणित सुटत नाहीं, कविता पाठ होत नाहीं, किंवा काय वाचलें तेंही सांगतां येत नाहीं !

असें असलें तरी पण आपलें हें अस्थिर मन स्थिर करितां येतें ! '**प्रबळ इच्छाशक्ति**' ह्या मनाला आवरूं शकते असा अनुभव आहे. परंतु ही इच्छाशक्ति मनांतच उत्पन्न व्हावयाची असते ही मोठीच गंमत नव्हे का ! अमुक एक गोष्ट मी करणारच करणार असें इच्छाशक्तीनें ठरविल्यानंतर मन त्याचप्रमाणें वागूं लागतें ! दुसरें असें कीं मनाला ज्या गोष्टीची स्वाभाविक '**आवड**' असते त्या गोष्टींत मन गुंतून राहूं शकतें. एखाद्याला इतिहास आवडतो तर एखाद्याला चित्रकला आवडते ह्याचें कारण हेंच होय. मन हें '**सौंदर्यप्रिय**' असतें. सृष्टिसौंदर्यानें आपलें मन मोहित होऊन जातें असा नाहीं का आपल्याला अनुभव येत ?

ह्यावरून ( १ ) **इच्छाशक्ति**, ( २ ) **आवड** व ( ३ ) **सौंदर्य** ह्या साधनांनीं आपल्याला आपलें मन स्थिर करितां येईल. मन असें स्थिर करितां येऊं लागल्यावर आपल्या मनाला सामर्थ्य उत्पन्न होत जाईल व ह्या **मनाच्या सामर्थ्यानें** आपल्याला आपल्या **धर्माचें रक्षण** करितां येईल.

## ६

**पुराणें व इतिहास ह्यांचा धर्माशीं संबंध**—**धर्माचरण** व **धर्मरक्षण** ह्यांसाठीं **शरीर** व **मन** ह्या दोहोंचें सामर्थ्य लागतें असें आपण पाहिलें. हें दोन्ही प्रकारचें सामर्थ्य कसें प्राप्त करून घेतां येईल ह्याचाही थोडासा विचार **धर्म** व **आरोग्यशास्त्र** ह्या दोहोंच्या संगतीनें केला. ह्या दोन प्रकारच्या सामर्थ्याचा उपयोग धर्माचरण व धर्मरक्षण ह्यांसाठीं झाल्याचीं कांहीं उदाहरणें आपण पाहूं या.

पौराणिक काळांतील **भीम** व **अर्जुन** ह्यांचें उदाहरण आपण आतां घेऊं. भीमाच्या अलोट सामर्थ्याचा उपयोग पांडवांना जय मिळण्याचे

कामीं झालाच असला पाहिजे व त्यामुळेंच दुष्टांचा नाश व धर्माचें रक्षण झालें. युद्धाच्या वेळीं **श्रीकृष्णानें अर्जुनाला** उपदेश करून मनाला दृढपणा आणून दिला म्हणूनच अर्जुनानें **भारतीय युद्ध** चांगल्या प्रकारें करून **धर्माला** सुरक्षित ठेविलें.

आपण रामायणाकडे वळूं. रामाचें **मन** अत्यंत खंबीर होते म्हणूनच त्यानें खडतर असा **वनवास** भोगिला. आपली



**माता व पिता ह्यांचेसाठीं आपण वाटेल तो त्याग केला पाहिजे,** हाच आपला धर्म आहे असें रामचंद्रानें वनवास भोगून जगाला पटवून दिलें. रामाचा सेवक **मारुति** हा त्याचे फार उपयोगीं पडला हें आपल्याला माहीत आहे. मारुतीचा लंकेतील पराक्रम, रामेश्वरच्या सेतूकरितां त्यानें दाखविलेलें सामर्थ्य व लक्ष्मणाकरितां सर्व **द्रोणागिरी उचलून आणणें** ह्या गोष्टी पाहिल्या म्हणजे आपल्याला



आश्चर्य वाटतें. मारुतीच्या ह्या **सामर्थ्यामुळें राक्षसांचा संहार, रामाचा विजय** व **धर्माचें रक्षण** झालें नाहीं काय ?

आपण ह्या सर्वांच्या सामर्थ्याला दैवी सामर्थ्य म्हणूं; ठीक आहे. आतां ऐतिहासिक काल पाहूं. **शिवाजीमहाराजांनीं** स्वराज्य स्थापन करून स्वधर्माचें रक्षण केलें असें आपण म्हणतों. ह्या **धर्मरक्षणा**-करितां त्यांना **शरीर** व **मन** ह्यांचे कष्ट किती पडले ह्याची आपल्याला खरी कल्पनाच येणार नाहीं ! मराठ्यांच्या एकंदर सर्व इतिहासांत धर्मरक्षण हें एक महत्त्वाचें अंग दिसून येतें. **चिमाजी**

**अप्पाची वसईवरील मोहीम** हें एकच उदाहरण ह्या बाबतींत पुरेसें आहे ! मराठ्यांप्रमाणेंच **रजपूत** व **शीख** ह्यांचाही इतिहास 'धर्मरक्षण' केलें पाहिजे असेंच सांगतो !

एकंदरींत आपल्याला धर्माचरण व धर्मरक्षण करावयाचें असेल तर शरीर व मन ह्यांचें सामर्थ्य आपण मिळविलें पाहिजे असें दिसून येतें.

७

**आदर्श नागरिक**—कोणत्याही देशांत राहाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला '**नागरिक**' म्हणतात. ह्या नागरिकांवरच देशाची बरीवाईट स्थिति अवलंबून असते. '**धर्म** व **नीति**' म्हणून जशीं कांहीं बंधनें प्रत्येक व्यक्तीला असतात, तशीं कांहीं बंधनें '**नागरिक**' म्हणूनही असावीं लागतात.

आर्यांच्या **उपनिषद्** नांवाच्या ग्रंथामध्यें पुढीलप्रमाणें एक 'वचन' आहे :—

**"मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। अतिथिदेवो भव।**...............इ०

ह्या वचनांत आरंभीं '**मातृदेवो भव**' असें म्हटलें आहे. '**आईला देव माना**' असा त्याचा सामान्यपणें अर्थ आहे. माता ही थोर आहे, ती देवाच्या योग्यतेची आहे ह्यांत शंकाच नाहीं ! पण आपली **जन्मभूमि** ही सुद्धां आपली माता नव्हे का ? ज्या भूमीवर आपला जन्म झाला तीच भूमि आपल्याला 'अन्नपाणी' देते व आपल्याला वाढविते. ती भूमि आपल्याला मांडीवर घेऊन हसविते व खेळविते, तर मग आपण तिचे पुत्र व ती आपली माताच नव्हे का ?

आपण स्वतःचा अभिमान बाळगितों व ज्या कुळांत आपण जन्माला आलों त्या कुळाचाही अभिमान आपण बाळगितों ; ह्याप्रमाणें आपण आपल्या **धर्माचा** व **देशाचा**ही अभिमान बाळगला पाहिजे.

आपल्या पूर्वजांनीं आपला धर्म संरक्षिला व इतिहास घडविला म्हणून "हा आमचा धर्म", "हा आमचा इतिहास" असें आपल्याला म्हणतां येतें. पूर्वजांचें हें ऋण आपण फेडलें पाहिजे.

सुदैवानें आपल्या देशाचा इतिहास फार तेजस्वी असा आहे. **वेदांची भूमि** हीच होय; **रामायण, महाभारत** हे आदर्श ग्रंथ ह्याच देशांत झाले. साऱ्या जगाला तत्त्वज्ञान शिकविणारी **गीता** ह्याच देशांत उपदेशिली गेली. इतर जग रानटी अवस्थेंत असतां ह्या देशांत **सुधारलेलीं साम्राज्यें** होऊन गेलीं. **सुवर्णाचें युग** ह्याच देशांत होऊन गेलें. ज्या धर्माचें व ज्या देशाचें संरक्षण आपल्याला नागरिक म्हणून करावयाचें आहे तो धर्म व तो देश असा आहे.

ह्यासाठीं आदर्श **नागरिक** व्हा; स्वतःचा उत्कर्ष करा, पण **समाज** व **देश** ह्यांकडे लक्ष ठेवा; शौर्य दाखवा, पण निर्दय होऊं नका; वैभव मिळवा, पण **त्यागबुद्धि** ठेवा; स्वधर्मासाठीं **सर्वस्व** अर्पण करा, पण परधर्माचा अनादर करूं नका; सुखांचा अनुभव घ्या, पण परमेश्वराला विसरूं नका; ह्या कामीं तुम्हांला **धर्माचा विरोध नाहीं, धर्म तुमच्या आड येत नाहीं** इतकेंच नव्हे, तर ह्यासाठीं तुम्ही झटत असतांना **धर्म व देव तुमच्या पाठीशीं उभा आहे** असा विश्वास ठेवा.

## ८

**प्रपंच** व **धर्म**—'**आदर्श नागरिक**' म्हणून आपण आपलें आयुष्य कसें खर्च केलें पाहिजे ह्याचा थोडा विचार केला पाहिजे. ह्यासाठीं आपले मूळ पूर्वज जे '**आर्य**' ते आपलें आयुष्य कसें घालवीत तें पाहूं.

आर्य लोकांनीं आपल्या 'शंभर वर्षें' आयुष्याचे चार विभाग पाडिले होते. प्रत्येक विभागाला ते '**आश्रम**' असें म्हणत.

( १ ) **ब्रह्मचर्य**, ( २ ) **गृहस्थ**, ( ३ ) **वानप्रस्थ** व ( ४ ) **संन्यास** असे ते चार आश्रम असत.

त्या काळीं वेदांचा अधिकार ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या सर्वांना असे. ह्या कुलांतील कुमार अनुक्रमें ८, ११ व १२ वर्षांचा झाला कीं त्याचें **उपनयन** [ मौंजीबंधन ] होऊन तो **गुरुगृहीं** जाई व तेथें बारा वर्षें राहून विद्याभ्यास करी. हाच त्याचा ‘ **ब्रह्मचर्याश्रम** ’ होय.

गुरुगृहीं अध्ययन पूर्ण झाल्यानंतर मोठा झालेला कुमार आपले घरीं परत येई. नंतर त्याचा विवाह होऊन तो **गृहस्थाश्रमी** होई. ह्या आश्रमांत तो आपलीं संसारविषयक कर्तव्यें पार पाडीत असे. हा गृहस्थाश्रम साधारणपणें वयाच्या पन्नासाव्या वर्षापर्यंत असे.

ह्यानंतर प्रत्येकाला आपल्या घराचा त्याग करून वनामध्यें जाऊन राहावें लागे. तेथें ‘ सुखापासून दूर ’ होण्याचा प्रयत्न करावयाचा असे. हा **वानप्रस्थाश्रम** होय. ह्यानंतर प्रत्यक्ष ‘ **संन्यास** ’ घ्यावा लागे ! ह्या आश्रमांत गांवोगांव हिंडून भिक्षेवर निर्वाह करावा व सर्व लक्ष परमेश्वराकडे लावून त्याची प्राप्ति करून घ्यावी असा प्रकार दिसून येई.

हल्लींच्या काळांत हे आश्रम पाळीत नाहींत. आयुष्याच्या आरंभाच्या भागांत विद्या शिकतात, पण त्यासाठीं गुरुगृहीं राहावें लागत नाहीं. नंतर विवाह करून सर्वजण ‘ गृहस्थ ’ होतात, पण आत्तांच्या ह्या गृहस्थाश्रमाला कालमर्यादाच नाहीं ! आयुष्य संपेपर्यंत हा चालत असतो !

मनुष्यानें गृहस्थाश्रम हा स्वीकारला पाहिजे ह्यांत शंका नाहीं. **रामदासस्वामींनीं** तर ह्या आश्रमाला ‘ सकळांमध्यें उत्तमोत्तम ’ असें म्हटलें आहे ! पण ह्या आश्रमामध्यें मनुष्य एकदा गुरफटल्यानंतर तो त्यांतून बाहेर येत नाहीं म्हणूनच पूर्वीच्या अनेक संतांनीं संसाराचा निषेध केला असावा ! **तुकाराम, गोरा कुंभार, चोखामेळा** ह्यांनीं

संसार केला, पण त्यांचें लक्ष संसाराकडे किती होतें हें आपल्याला माहीत आहे !

प्रपंचाला धर्माचा विरोध नाहीं, परंतु तो करीत असतां आपलें सारें लक्ष त्यांतच गुंतून गेलें पाहिजे असें नाहीं. संसार करीत असतांना धार्मिक बंधनांत राहून सुखांचा उपभोग घ्यावा, परंतु त्या सुखांतच गढून जाऊन आपल्या आयुष्याचा शेवट होऊं नये. आपले **बांधव**, आपला **देश** आणि शेवटीं सर्व **मनुष्यजाति** ह्यांच्याही हितासाठीं झटत असतां हळुहळू आपलें चित्त शांत करीत आपलें आयुष्य परमेश्वराकडे लावण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

९

**सत्य, प्रेम व अहिंसा**—'सर्वांनीं सत्य बोलावें' असें आपण म्हणतों. पण **सत्य** म्हणजे काय? 'सत्य' म्हणजे 'खरें' असें कोणी म्हणतील; पण हा सामान्य अर्थ झाला. सत्याची व्याख्या करावयाची झाल्यास "**सत्यं शिवं शाश्वतम्**" अशी करितां येईल; म्हणजे जें 'कल्याणकारक व कायम टिकणारें' तें 'सत्य' होय.

सत्य हें जर असें आहे तर मग '**सत्य बोला**' असें कां बरें सांगावें लागतें? '**सत्यापरता नाहीं धर्म। सत्य तेंचि परब्रह्म। सत्यापाशीं पुरुषोत्तम। सर्वकाळ तिष्ठत ॥**' असें रामदासस्वामींना कां बरें म्हणावें लागलें? मनुष्य अज्ञानानें व स्वार्थासाठीं 'खोटें' बोलतो असें दिसून येतें. मनुष्य क्षणिक सुखाकडे नजर ठेवितो, त्याचा दूरवर विचार करीत नाहीं आणि शेवटीं खोटें बोलून जातो असा आपल्याला अनुभव येतो.

प्राचीन काळीं '**सत्ययुग**' होतें व त्या काळीं सर्वजण सत्य बोलत असें म्हणतात! हल्लीं कित्येकजण सारखें खोटें बोलतात, कां तर हल्लीं '**कलियुग**' आहे!! कलियुग आहे म्हणून खोटें बोलणें ही खरोखर

फार दुःखाची गोष्ट आहे. खोटें बोलून '**मनाचें पावित्र्य**' तर जातेंच, शिवाय मिळणारें सुख कायम टिकत नाहीं व मनाला शांतता आणि समाधान ह्यांचा लाभ होत नाहीं असें आपल्याला दाखवून देतां येईल. ह्यासाठीं खरें बोला; चूक झाली तरी कबूल करा पण खोटें बोलूं नका. मनाला पश्चात्ताप होऊं द्या म्हणजे चित्त शुद्ध होत जाईल.

दुसऱ्याविषयीं आपल्याला जें '**आकर्षण**' वाटतें तें '**प्रेम**' होय. प्रेम मनांत उत्पन्न होतें आणि तेथेंच तें वाढतें. मनुष्य **स्वजन, स्वदेश** आणि **स्वधर्म** ह्यांवर प्रेम करितो; परंतु हें सर्व प्रेम कारणपरत्वें असतें! सर्व मनुष्यजातीवर अगर त्याच्याही पलीकडे सर्व **जीवमात्रावर** प्रेम असेल तर तें अलौकिक प्रेम होय. हें प्रेम साधुसंत व थोर व्यक्ति ह्यांच्या ठिकाणीं दिसून येतें.

प्रेमानें प्रेम वाढतें व त्यानेंच मन जिंकतां येतें. ह्यासाठीं सर्वांवर प्रेम करा. जें जें **पवित्र** व **पूज्य** असेल त्यावर **प्रेम** करा. **दीन** व **दुःखी** असतील त्यांवर **प्रेम** करा. **परमेश्वराला सारीं लेकरें सारखीं असतात** अशीच धर्माची शिकवण आहे.

मनाच्या विकासाचें तिसरें लक्षण म्हणजे '**अहिंसावृत्ति**' होय. दुसऱ्याच्या 'शरीराला' व 'मनाला' दुःख न देणें म्हणजे अहिंसा होय. पण ह्या अहिंसेपेक्षां हिंसाच जिकडेतिकडे आढळून येते! **धन, विद्या, अधिकार** व **कुल** ह्यांनीं श्रेष्ठ असलेलीं मनुष्यें पदोपदीं दुसऱ्याचें मन निष्कारण दुखवितात! दुराचारी व दुष्ट लोकांना शासन करण्याला धर्माची आज्ञा आहे पण निष्कारण हिंसा करण्याला धर्माची परवानगी नाहीं.

ह्याप्रमाणें '**सत्य, प्रेम** व **अहिंसा**' ह्यांचा स्वीकार प्रत्येकाच्या आचरणांत झाला पाहिजे; त्याशिवाय आयुष्यांतील 'खरी शांतता व खरें समाधान' कोणालाही प्राप्त होणार नाहीं.

## १०

**मनुष्याचें शील**—चांगल्या **संवयी** लागल्यामुळें मनुष्याचा जो **स्वभाव** बनतो त्याला '**शील**' असें म्हणतात. मनुष्याची खरी **किंमत** त्याच्या **शीलावर** अवलंबून असते. **सुगंधावांचून फुलाला जसें फूलपण नाहीं तसें शीलावांचून मनुष्याला मनुष्यपण नाहीं !**

**शील** हें मनाचें **पावित्र्य** दाखवितें; **थोर पुरुष** व **स्त्रिया** आपल्या **शीलाला** फार जपतात. शीलासाठीं आपल्या प्राणाचीही पर्वा तीं करीत नाहींत ! तर मग शील ही प्राणापेक्षां प्रिय वस्तु नव्हे का ? शीलरक्षणासाठीं राजा **हरिश्चंद्रानें** सर्वस्वाचा त्याग केला, शीलावरील आरोपामुळें **रामचंद्रानें सीतेचा** त्याग केला, आणि स्वतः **सीतेनें अग्निदिव्य** केलें, अशा प्रकारच्या कितीतरी गोष्टी पुराणांवरून समजतात.

फार पूर्वी घडलेल्या ह्या पौराणिक गोष्टी घटकाभर बाजूला ठेवून आपण ऐतिहासिक काळाकडे पाहूं. ऐतिहासिक काळांत सातव्या शतकांत आपल्या पूर्वजांचें शील कसें असे ह्याची कल्पना आपल्याला करितां येईल. त्या शतकांत आपल्या देशांत '**हर्ष**' नांवाचा सार्वभौम राजा होऊन गेला. त्याच्या कारकीर्दींत '**ह्यू-एन्-चँग**' नांवाचा एक चिनी प्रवासी हिंदुस्थानांत आला होता. सर्व हिंदुस्थानांत फिरल्या-नंतर आपल्या पूर्वजांविषयीं त्यानें काय बरें लिहून ठेविलें आहे ?

'ह्यू-एन्-चँग' म्हणतो—

"हिंदुस्थानांतील लोक आपल्या घरांना कुलुपें लावीत नाहींत व ते खोटें बोलत नाहींत ! ते विश्वासघात करीत नाहींत व फिर्यादी करणें त्यांना माहीत नाहीं !! बेसावध शत्रूवर ते चालून जात नाहींत व लूट करीत नाहींत ! शरण आलेल्यांना ते दयेनें वागवितात. **राजा प्रजेच्या कल्याणाची काळजी घेतो व जिकडे तिकडे शांतता आणि सौख्य** हीं दिसून येतात !"

हें आपल्या पूर्वजांचें शील पाहा आणि आतां हल्लींच्या काळाकडे नजर टाका! काय बरें दिसून येतें? कित्येक लोक हल्लीं खोटें बोलतात व खोट्या **साक्षी** देतात! विश्वासघात करून दुसऱ्याला फसवितात आणि त्यांत समाधान मानितात! स्वतःच्या सुखासाठीं दुसऱ्याचें सुख हिरावून घेतात व त्यांतच संतोष मानितात! पवित्र गोष्टींची निंदा करितात किंवा त्यांना कलंक लावितात आणि तेंच मोठें भूषण मानितात.

असें जरी असलें तरी सर्वच मनुष्यें कांहीं सारखीं आढळत नाहींत. **आजही कित्येक थोर पुरुष आपल्याला अत्यंत शीलवान्** दिसून येतात. व्यक्ति म्हणून स्वतःकरितां—नागरिक म्हणून राष्ट्राकरितां—व मनुष्य म्हणून जगाकरितां आपल्या शीलाला ते अत्यंत जपतात. आपण त्यांचीं चरित्रें वाचून आपलें **शील अगदीं निष्कलंक** ठेविलें पाहिजे.

## ११

**दया आणि परोपकार**— श्रीमंत व गरीब, विद्वान् आणि अज्ञानी, समर्थ व दुर्बल, सुखी आणि दुःखी, अशा विरोधी गोष्टींनीं जग भरलेलें दिसतें. हा **विषमपणा** दुःखाला कारण होत असतो. परंतु अशाही स्थितींत **शांतता** व **समाधान** उत्पन्न करणारें कांहीं साधन आहे का तें पाहूं या.

दुसऱ्याचें दुःख पाहून आपल्यालाही दुःख होणें ह्याला '**सहानुभूति**' म्हणतात. थोर मनुष्याच्या ठिकाणीं ही सहानुभूति असते. ते दुसऱ्याचें दैन्य पाहून कष्टी होतात इतकेंच नव्हे, तर त्यांच्या हातीं जीं साधनें असतात त्यांचा उपयोग ते दुसऱ्याचें दुःख नाहींसें होण्यासाठीं करितात. मनाची ही जी वृत्ति, तिलाच '**दया**' असें म्हणतात.

पशुपक्ष्यांतसुद्धां ही दयाबुद्धि असते असें म्हणतात; तर मग ज्याला विचारी मन आहे त्याचे ठिकाणीं ही दया नसावी काय? '**दया धर्मका मूल है**' किंवा 'दया, क्षमा, शांति। तेथें देवाची वसती॥' हीं सत्पुरुषांचीं वचनें काय बरें दाखवितात? जे कोणी सुखी वा

श्रीमंत असतील, ते तरी देवाच्या दयेनेंच तसे झाले ना? मग आपल्यालाही **दयाळू झालें पाहिजे** हें उघड आहे.

ह्यासाठीं जे श्रीमंत असतील त्यांनीं गरिबांना साह्य केलें पाहिजे. जे ज्ञानी असतील त्यांनीं दुसऱ्यांचें अज्ञान दूर केलें पाहिजे व जे सबळ असतील त्यांनीं दुर्बळांचें रक्षण केलें पाहिजे. **सर्वांना सुख, शांति व समाधान लाभण्याचें दया हें एक साधन** होय.

आपण '**धर्म**' म्हणून '**दान**' करितों. ह्या दानपद्धतीचें स्वरूप परोपकाराकडे बदलत गेलें पाहिजे. ज्याला खरोखर मदतीची जरुरी असेल त्यालाच दान करा. धार्मिक कार्यांतील डामडौलाचा खर्च कमी करून तो जर **दया** व **परोपकार** ह्यांकडे होत जाईल तर समाजांतील हालअपेष्टा पुष्कळशा नाहींशा झालेल्या दिसून येतील.

आपल्या दानधर्मपद्धतीला दिवसेंदिवस हें वळण लागत चाललेलें आहे. गरिबांना '**औषधांची मदत**', विद्यार्थ्यांना '**शिष्यवृत्ति**' व '**अनाथविद्यार्थीगृहें**' वगैरे ज्या गोष्टी अलीकडे अधिक प्रमाणांत दिसून येतात तें त्याचेंच फळ होय. आपण आपल्या दानधर्माचा ओघ असा योग्य दिशेनें वळविला पाहिजे.

## १२

**संदेश—गीता**! खरोखर ह्या दोन अक्षरांमध्यें किती बरें मोहिनी भरलेली आहे!! गीता ज्यानें वाचिली अगर ऐकिली त्याचें मन आनंदित झाल्यावांचून राहिलेंच नसेल. जगांतील अनेक भाषांत हिचा प्रसार झाला आहे इतकें हिचें जागतिक महत्त्व आहे!

आपल्या भक्ताच्या मनाच्या शांतिसमाधानासाठीं भगवान् **गोपालकृष्णानें** ही गायिली. तो प्रसंग लक्षांत घेण्यासारखा आहे. कौरवपांडवांचीं सैन्यें युद्धासाठीं कुरुक्षेत्रावर समोरासमोर उभीं राहिलीं असतां अर्जुनाला '**कर्तव्य म्हणजे काय**' ह्याचा 'भ्रम' पडला! आपले **भाऊ**, आपले **आप्त**, आपले **गुरुजन** ह्यांना ठार मारून

राज्य मिळविणें पाप होय असें त्याला वाटलें व त्यानें आपलें धनुष्य रथांत खालीं ठेविलें! त्याचा रथ हांकण्याचें काम प्रत्यक्ष भगवान् **कृष्ण** करीत होता. त्यानें हा प्रकार पाहून अर्जुनाला उपदेश केला व त्याच्या मनांतील भ्रम काढून टाकिला असा हा एकंदर सुंदर कथाप्रसंग आहे.

गीतेमध्यें **भगवंत** व भक्त **अर्जुन** ह्यांचा संवाद आहे. भक्त प्रश्न विचारीत आहे आणि देव उत्तर देत आहे, अशा रीतीनें अठरा अध्यायांत गीता पूर्ण झाली आहे. **मनुष्यमात्राला कर्म, ज्ञान** आणि **भक्ति** ह्यांपैकीं कोणत्याही साधनानें मोक्ष मिळतो असें गीता सांगते. कर्ममार्ग व ज्ञानमार्ग ह्यांपेक्षां भक्तिमार्ग अधिक सोपा असें समजतात.

अनेक साधुसंत ह्या भक्तिमार्गानें परमेश्वराकडे वळले. परमेश्वराचें भजनपूजन करावें, प्रत्येक गोष्ट त्याला अर्पण करावी असें ह्या मार्गाचें सामान्य स्वरूप आहे. संसारांत राहून आपल्याला ह्या मार्गानें जातां येतें. '**जो कोणी परमेश्वराला शरण जातो त्याची सर्व काळजी परमेश्वर घेतो**' असा गीतेचा संदेश आहे.

परमेश्वराला शरण जाण्याकरितां '**प्रार्थना**' हें एक महत्त्वाचें साधन आहे. प्रार्थनेनें **मन शुद्ध** होतें व **शांतता** आणि **प्रसन्नता** प्राप्त होते. प्रत्येक धर्मांत प्रार्थनेला स्थान आहे. परमेश्वराची प्रार्थना निरनिराळ्या प्रकारांनीं करितां येईल. त्याचें **भजनपूजन** ही प्रार्थनाच होय. **धार्मिक ग्रंथांचें वाचन** हें सुद्धां प्रार्थनेचेंच एक अंग आहे. आपल्या देशांत ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास, चोखामेळा, गोरा कुंभार, मुक्ताबाई, जनाबाई, वगैरे कितीतरी संतजन होऊन गेले; त्यांचे **धार्मिक ग्रंथ** आपल्या नित्य वाचनांत येत जावे.

प्रार्थनेकरितां कोणतीही वेळ चालते. पण प्रातःकाळ ही सर्वांत शान्त वेळ होय. तसेंच प्रार्थना कोणींही केली तरी चालते. तेव्हां **आपणही ह्या प्रार्थनेच्या मार्गानें भगवंताकडे जाण्याचा प्रयत्न** करूं या.

# पाठान्तर

## (१)

## कृष्णाची भूपाळी



ऊठिं गोपालजी जाइं धेनूकडे ॥
पाहती सौंगडे वाट तूझी ॥ ध्रु० ॥
लोपली हे निशी, मंद झाला शशी ।
मुनिजन मानसीं तूज ध्याती ॥ ऊठिं ॥ १ ॥
भानु-उदयाचळीं तेज पुंजाळलें ॥
विकसलीं कमलें उदकीं हीं ॥ ऊठिं ॥ २ ॥
धेनुवत्सें तुला बाहती माधवा ॥
ऊठिं गा यादवा उशिर झाला ॥ ऊठिं ॥ ३ ॥
ऊठिं पुरुषोत्तमा, वाट पाहे रमा ॥
दाविं मुखचन्द्रमा सकळिकांसी ॥ ऊठिं ॥ ४ ॥
कनकपात्रान्तरीं दीपरत्नें बरीं ॥
ओंवाळिती सुंदरी तूजलागीं ॥ ऊठिं ॥ ५ ॥
जन्मजन्मान्तरीं दास होऊं हरी ॥
बोलती वैखरी भक्त तूझे ॥ ऊठिं ॥ ६ ॥
कृष्णकेशव करीं चरणांबुज धरी ॥
ऊठिं गा श्रीहरी मायबापा ॥ ऊठिं ॥ ७ ॥

(२)

## प्रार्थना

या कुन्देन्दु-तुषार-हार-धवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिर्भिर्देवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेष-जाड्यापहा ॥ १ ॥
शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशम् ।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम् ॥
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यम् ।
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥ २ ॥
नमामि नारायणपादपंकजं करोमि नारायणपूजनं सदा ।
वदामि नारायणनाम निर्मलं स्मरामि नारायणतत्त्वमव्ययम् ॥ ३ ॥
मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥ ४ ॥
ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीः साक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ ५ ॥
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परंब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ६ ॥

(३)

## गीता — ध्यानम्

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयम् ।
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ॥
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी- ।
मम्ब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ १ ॥

नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र ।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥ २ ॥
प्रपन्नपारिजाताय स्तोत्रवेत्रैकपाणये ।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥ ३ ॥
सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ४ ॥
वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥ ५ ॥
भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गांधारनीलोत्पला ।
शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला ॥
अश्वत्थामविकर्णघोरमकरा दुर्योधनावर्तिनी ।
सोत्तीर्णा खलु पाण्डवै रणनदी कैवर्तकः केशवः ॥ ६ ॥
पाराशर्यवचःसरोजममलं गीतार्थगन्धोत्कटं ।
नानाख्यानककेसरं हरिकथासंबोधनाबोधितम् ॥
लोको सज्जनषट्पदैरहरहः पेपीयमानं मुदा ।
भूयाद्भारतपंकजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ॥ ७ ॥
मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥ ८ ॥
यं ब्रह्मावरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै– ।
र्वेदैः साङ्गपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ॥
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो ।
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥ ९ ॥

(४)

## संत—वचनें

(१)

भावें गावें गीत । शुद्ध करोनियां चित्त ॥ १ ॥
जरि व्हावा तुज देव । तरि हा सुलभ उपाव ॥ ध्रु० ॥

आणिकांचें कानीं । गुणदोष मना नाणीं ॥ २ ॥
मस्तक ठेंगणा । करीं संतांच्या चरणां ॥ ३ ॥
तुका म्हणे फार । थोडा करीं उपकार ॥ ४ ॥

(२)

मन हा मोगरा अर्पुनी ईश्वरा ।
पुनरपि संसारा येणें नाहीं ॥ १ ॥
मन हें शेवंती अर्पूं भगवंतीं ।
पुनरपि संसृती येणें नाहीं ॥ २ ॥
मन हें तुळशी अर्पूं हृषीकेशी ।
पुनरपि जन्मासी येणें नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा जन्म दिला देवें ।
तया वास होणें वैकुंठासी ॥ ४ ॥

(३)

धर्माची तूं मूर्ती । पापपुण्य तुझे हातीं ॥ १ ॥
मज सोडवीं दातारा । कर्मापासूनि दुस्तरा ॥ ध्रु० ॥
करिसी अंगीकार । तरी काय माझा भार ॥ २ ॥
जीवींच्या जीवना । तुका म्हणे नारायणा ॥ ३ ॥

(४)

तुजवीण देवा मज कोणी नाहीं ।
माझी चिंता कांहीं असों द्यावी ॥ १ ॥
वैराग्यें कनिष्ठ अभावें वरिष्ठ ।
माझे मनीं नष्ट संदेहता ॥ २ ॥
विवेकें सांडिलें ज्ञानें ओसडिलें ।
चित्त हें लागलें तुझे पायीं ॥ ३ ॥
तुझें नाम वाचे उच्चारीत असें ।
अंतरीं विश्वास धरियेला ॥ ४ ॥

रामदास म्हणे मी तुझें अज्ञान ।
माझें समाधान करीं देवा ॥ ५ ॥

(५)

रामनामकथा गंगा । स्मरणें पावन करी जगा ॥ १ ॥
तिशीं प्रेमपूर आला । शंकरहृदयीं सामावला ॥ ध्रु० ॥
रामदासाची माउली । आळशावरी गंगा आली ॥ २ ॥

(६)

नाम वदतां वैखरी । चित्त धांवे विषयावरी ॥ १ ॥
कैसें होताहे स्मरण । स्मरणामाजी विस्मरण ॥ २ ॥
नामरूप नाहीं मेळ । नुसता वाचेचा गोंधळ ॥ ३ ॥
एका जनार्दनीं नाम । नामीं प्रगटे आत्माराम ॥ ४ ॥

(७)

नामें दोष जळती । नामें पापी उद्धरती ॥ १ ॥
हें तों आलें अनुभवा । सत्य जीवा प्रत्यया ॥ २ ॥
नामें अपार तारिले । नामें जीवन्मुक्त केले ॥ ३ ॥
कान्हूपात्रा नाम घेतां । पायीं जडली तत्त्वतां ॥ ४ ॥

(८)

काय माझा आतां पाहतोसी अंत ।
येईं बा धांवत देवराया ॥ १ ॥
तुजवीण होई जीवासी आकान्त ।
येईं बा धांवत देवराया ॥ २ ॥
असे जरी काम भेटोनीयां जावें ।
धांवोनीयां यावें देवराया ॥ ३ ॥
ये रे ये रे देवा नामा तुज बाहत ।
येईं बा धांवत देवराया ॥ ४ ॥

(९)

ज्याचा सखा हरी । त्यावरि विश्व कृपा करी ॥ १ ॥
उणें पडों नेदी त्याचें । वारें सोसी आघातांचें ॥ २ ॥

तयावीण क्षणभरी । कदा आपण नव्हे दुरी ॥ ३ ॥
आंगीं आपुले वोढोनी । त्याला राखी जो निर्वाणीं ॥ ४ ॥
ऐसा अंकित भक्तांसी । म्हणे नामयाची दासी ॥ ५ ॥

( १० )

असाल तेथें नामाचें चिंतन । याहूनी साधन आणिक नाहीं ॥ १ ॥
सोडवील माझा भक्तांचा कवारी । प्रतिज्ञा निर्धारीं केली आम्हीं ॥ २ ॥
गुणदोषयाती न विचारी कांहीं । धांवे लवलाहीं भक्तकाजा ॥ ३ ॥
अवघे काळीं वाचे म्हणा नारायण । सेना म्हणे क्षण जाऊं द्या ना ॥ ४ ॥

( ११ )

हिंदी पद

रामभजनकू दिया कमलमुख । रामभजनकू दिया ॥ ध्रु० ॥
लक्ष चौऱ्यायशीं फेरे फिरकर सुंदर नरतनु पाया ॥ १ ॥
खाया पिया सुखसे सोया इनोने क्या कमाया ॥ २ ॥
जो मुख निशिदिनिं रामनाम नहि वहा तुम कछु नहि किया ॥ ३ ॥
कहत कबीरा सुन भाई साधु । आया वैसा गया ॥ ४ ॥

( १२ )

गुजराथी पद

[ राग — खमाज धुमाळी ]

वैष्णव जन तो तेने कहीए जो पीड पराई जाणे रे ।
परदुःखे उपकार करे तोये, मन अभिमान न आणे रे
सकळ लोकमा सहुने वंदे, निंदा न करे केनी रे
वाच काछ मन निश्चळ राखे, धन धन जननी तेनी रे
समदृष्टि ने तृषा त्यागी, परस्त्री जेने मात रे
जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हाथ रे
मोह माया व्यापे नहि जेने, दृढ वैराग्य जेना मनमां रे
वणलोभी ने कपटरहित छे, काम क्रोध निवार्या रे
भणे नरसैंयो तेनुं दरशन करतां, कुळ एकोतेर तार्यां रे

(५)

## देशगीतें

(हिंदी)

भारत हमारा देश है हित उसका निश्चय चाहेंगे।
उसके हितके कारन हम कुछ ना कुछ कर जायेंगे।
भारत हमारी मातृभूमि उसका ऋण हमपर है बहू।
उसके मिटाने के लिये हम कुछ ना कुछ कर जायेंगे।
धर्म विद्या और धनसे उन्नति भारत की होवे।
उस उन्नतिके मार्गमें हम कुछ ना कुछ कर जायेंगे॥

(संस्कृत)

वन्दे त्वां भूदेवीं आर्यमातरम्।
जयतु जयतु पदयुगुलं ते निरंतरम्॥ ध्रु०॥

विकसित-नव-कुसुम-मृदुलदाम-शोभिनीम्।
मन्द-स्मित-युक्त-वदन-मधुर-भाषिणीम्।
सुजलां, सुफलां, तरलां, शिववरदाम्।
चिरसुखदां, मुकुलरदां, आर्यमातरम्॥ १॥

दशक-त्रय-कोटि-जन-कंठ-नादिनीम्।
अमितभुजां घृतसदसिं तनयतारिणीम्।
हिमनगजां स्वाभिमान-बुद्धिदायिनीम्।
कमलां, अमलां, अतुलां रिपुहरिणीम्
बलकरिणीं, धृतनालिनीं, आर्यमातरम्॥ २॥

धर्मस्त्वं, शर्म त्वं, त्वं यशोबलम्।
शक्तिस्त्वं, भक्तिस्त्वं, कर्म चाखिलम्।
प्रतिसदनं प्रतिमा ते त्वं महाफलम्।
धरणीं, भरणीं, जननीं, कविप्रतिभाम्।
नतसुलभां जगदम्बां राष्ट्रमातरम्॥ ३॥

---

# आपला धर्म

## खंड तिसरा

### १

**विषय–प्रवेश**—आपण पुष्कळ वेळां **इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, जपान** हे देश फार सुधारलेले आहेत असें म्हणतों. पण ‘सुधारलेला देश म्हणजे काय?’ असें कोणीं विचारल्यास आपण त्याला काय बरें उत्तर देऊं? ‘त्या देशांतील लोकांनीं आपल्या बुद्धीच्या जोरावर अनेक शोध लावून लोकांच्या सुखसोयींत फार मोठी भर घातली आहे’, असें किंवा अशाच प्रकारचें कांहींतरी उत्तर आपण देऊं हें उघड आहे.

आज जसे कांहीं देश आपल्याला सुधारलेले दिसतात, तसे प्राचीन काळींही कांहीं देश सुधारलेले होते हें आपल्याला माहीत आहे; **हिंदुस्थान, चीन, ईजिप्त, ग्रीस** अशीं कांहीं नांवें आपल्याला सांगतां येतील. अनेक विद्या व कला प्राचीन काळीं ह्या देशांत भरभराटीस आल्या होत्या. चिनी लोकांना एक प्रकारची ‘मुद्रणकला’ येत होती; मिसर म्हणजे ईजिप्त देशांतील लोकांना शिल्पकला अवगत होती; आणि **ज्योतिष, वैद्यक, नौकानयन, शिल्प** वगैरे अनेक **विद्या व कला** ह्यांचें **माहेरघर म्हणून हिंदुस्थान** त्या काळीं प्रसिद्ध होतें!

कोणताही देश कोणत्याही काळीं सुधारलेला असो, पण ‘सुधारलेला देश’ म्हटल्याबरोबर तेथील लोकांच्या ‘**विद्या व कला**’ व तेथील लोकांची ‘**एकंदर स्थिति**’ ह्याच गोष्टी चटकन् आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहातात.

देश म्हटला कीं तेथें '**समाज**' हा असावयाचाच. पण समाज म्हणजे काय? समाज म्हणजे **लोकसमुदाय** किंवा **लोकसमूह.** प्रत्येक देशांत समाज असतात आणि कोणताही समाज व्यक्तीव्यक्तींनीं तयार होतो. **व्यक्तीच्या सुधारणेवर समाज व समाजाच्या सुधारणेवर देश** अवलंबून असतो. सुताच्या अनेक धाग्यांचा व रंगांचा परिणाम जसा एकंदर वस्त्रावर होतो, त्याप्रमाणेंच हें सर्व आहे. एकंदरींत देशाच्या सुधारणेंत 'व्यक्ति' हा एक महत्त्वाचा घटक दिसून येतो असें म्हटलें पाहिजे.

२

**मनुष्याचा विशेषपणा**—आपण आपल्या सभोवतीं असलेल्या सृष्टीचें जों जों निरीक्षण करावें, तों तों तिची **सुंदरता** व तिजमधील अनेक प्रकारचे **चमत्कार** पाहून आपल्याला नवल वाटतें. **दिवस** व **रात्र, महिने** आणि **ऋतु, जन्म** आणि **मृत्यु,** ह्यांचा क्रम ह्या सृष्टींत सारखा दिसून येतो. **सूर्य, चंद्र** व अनंत **तारे** उगवतात आणि मावळतात; वसंत ऋतूंत झाडांना पालवी येऊन तीं फलपुष्पभारानें डोलूं लागतात; वर्षाऋतूंत आकाश मेघांनीं भरून जाऊन पाऊस पडतो आणि सृष्टींतील पर्वत आपल्या सर्व अंगावर होणारा पावसाचा वर्षाव नद्यांच्या रूपानें खालीं सोडून देतात!

अशा ह्या सृष्टीवर अनंत जीव आपल्याला दिसून येतात. **जमीन, आकाश** आणि **पाणी** ह्या सर्व ठिकाणीं हे **जीव** भरून राहिलेले आहेत. ह्याशिवाय सजीव वृक्षवेली आणि निर्जीव वस्तु आहेत त्या निराळ्याच! सजीव व निर्जीव वस्तूंनीं भरलेली अशी ही **सृष्टि करणारा** कोणीतरी नसावा काय? असला पाहिजे. असा कोणीतरी 'आहे' असेंच सर्व धर्म सांगतात. कोणी त्याला '**ईश्वर**' म्हणतात, कोणी '**खुदा**' म्हणतात, तर कोणी त्याला '**आकाशांतील बाप**' म्हणतात, इतकाच काय तो फरक आहे.

ह्या सृष्टिकर्त्याला आपण '**परमेश्वर**' म्हणूं. ह्या परमेश्वराचें सामर्थ्य कोण बरें बरोबर जाणूं शकेल? एकटा एक '**मनुष्य**' काय तो त्याच्या-बद्दल नुसता विचार करूं शकेल! त्याची विचार करण्याची ही जी शक्ति, तिला आपण '**जाणीव**' किंवा '**बुद्धि**' असें नांव देऊं. ह्या बुद्धीचा उपयोग मनुष्यानें काय करून घेतला आहे तें आपण थोडक्यांत पाहूं.

## २

**बुद्धीचा उपयोग**—फार फार प्राचीन काळीं **मनुष्य** हा अगदीं रानटी स्थितींत होता. तो जनावरांचें कच्चें मांस भक्षण करी. विद्या अगर कला त्याला येत नव्हत्या इतकेंच नव्हे, तर त्याला वस्त्राची सुद्धां कल्पना नव्हती! प्रत्येक बाबतींत तो मागासलेला होता. पण आपल्या **बुद्धीच्या जोरावर तो थोडथोडा सुधारण्याच्या मार्गास लागला.** त्याच्या शोधक बुद्धीनें लाविलेला पहिला मोठा शोध म्हणजे '**अग्निसाधन**' हा होय!

मनुष्याची सुधारणा दिवसेंदिवस सारखी होतच गेली. हळुहळू तो सृष्टीच्या रचनेविषयीं विचार करूं लागला. ह्या सृष्टीचा कोणीतरी **कर्ता** असला पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. इतकेंच नव्हे तर ह्या कर्त्याला प्रसन्न करण्यासाठीं तो स्वतःला **बंधनें** घालूं लागला. ह्या बंधनांमुळें त्याच्या आचारविचारांत फरक पडलेला दिसून येऊं लागला.

असा प्रकार चालू असतां, त्याच्या कांहीं कल्पना कायम होऊन बसल्या. 'पृथ्वी सपाट आहे' ही कल्पना मनुष्यानें कित्येक वर्षें मनांत बाळगिली होती! '**ही पृथ्वी गोल आहे**' असें ज्या वेळीं कोणी एकजण म्हणूं लागला त्या वेळीं त्याचा फार छळ झाला! कारण त्याचें हें म्हणणें मूळ कल्पनेच्या अगदीं विरुद्ध असें होतें!! जेव्हां पहिली **आगगाडी** एका देशांत धावली, तेव्हां तेथील लोकांनीं ती '**भुताटकी**'

मानिली ! सूर्यचन्द्रांचीं ग्रहणें कशीं होतात हें आतां सर्वांना माहीत आहे. पण ह्याविषयीं पूर्वींच्या कल्पना काय बरें होत्या? '**राहू** आणि **केतु**' हे मनुष्यानें आपल्या कल्पनेनें उत्पन्न केलेले राक्षस **सूर्य** व **चंद्र** ह्यांना गिळतात असें आपण समजत होतों !!

'**कारणाशिवाय कार्य घडत नाहीं**' असा एक नियम आहे. सृष्टीमध्यें जें जें कांहीं विचार करण्यासारखें घडत आहे, त्याचा विचार मनुष्य एकसारखा करीत आहे. 'पाऊस पडणें' ही एकंदरींत परमेश्वराची कृपा असेल, पण तो कसा पडतो हें मनुष्यानें शोधून काढिलें आहे. **सृष्टिरचनेचें मूळ शोधून काढण्याकडे मनुष्यानें आपल्या बुद्धीचा उपयोग चालविला** आहे व त्या कामीं त्याला अधिकाधिक यश येत चाललें आहे असें आपल्याला दिसून येत आहे.

## ४

**शोध व त्यांचे प्रकार**—शोधकांच्या श्रमानें जसजसे निरनिराळे शोध लागूं लागले, तसतशी मनुष्याच्या ज्ञानांत भर पडूं लागली व **नवनवीन शास्त्रें** उत्पन्न होऊं लागलीं. वनस्पतिशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र वगैरे अनेक नव्या जुन्या शास्त्रांची सारखी वाढ चाललेली आहे. आज आपल्याला आगगाड्या, विमानें, तारायंत्र, रेडिओ वगैरे अनेक गोष्टी दिसतात, त्या सर्व संशोधकांच्या श्रमांचें फळ होय.

सृष्टीमध्यें नेहमीं **उत्पत्ति, स्थिति** व **नाश** हीं तीन कार्यें दिसतात. हीं कार्यें ज्यांच्यामुळें घडतात, अशीं पांच मोठीं तत्त्वें आहेत. **पृथ्वी** म्हणजे जमीन, **पाणी, तेज, वायु** व **आकाश** म्हणजे पोकळी. ह्या पांच तत्त्वांचें सामर्थ्य फार मोठें असल्यानें ह्या तत्त्वांना '**पंचमहाभूतें**' असें म्हणतात. संशोधकांनीं मुख्यतः ह्या पंचमहाभूतांसंबंधींच शोध लाविले आहेत. ह्या शोधांना '**भौतिक शोध**' म्हणतात.

पण ह्याशिवाय मनुष्याच्या बुद्धीचा दुसराही एक मोठा खटाटोप चाललेला आहे. मनुष्यप्राण्यांत '**आत्मा**' म्हणून जो एक **ईश्वरी अंश** आहे, त्यासंबंधीं विचार करणें हा तो खटाटोप होय. आत्म्यासंबंधाच्या ह्या विचाराला '**अध्यात्मविचार**' म्हणतात व ह्या अध्यात्म-विचाराच्या शास्त्राला '**अध्यात्मशास्त्र**' म्हणतात. सर्व **इंद्रियें** व **मन** ताब्यांत ठेवून एक प्रकारचें बळ उत्पन्न करितां येतें, त्याला '**योगसामर्थ्य**' म्हणतात. ह्या योगसामर्थ्याचा उपयोग अध्यात्म-शास्त्रांत करावयाचा असतो. ह्या सामर्थ्यानें अनेक प्रकारचे चमत्कार दाखवितां येतात ! हृदयाची क्रिया बंद ठेवणें, समाधि लावणें, जमिनींत पुरून घेणें, हे प्रकार आजही आपल्याला पाहावयाला सापडतात ! **ज्ञानेश्वरानें भिंत चालवून दाखविली** असें आपण म्हणतों ; ज्ञानेश्वराचें हें सामर्थ्य योगसामर्थ्यच होय.

'**अध्यात्मशास्त्र**' व '**योगशास्त्र**' ह्यांचें मूळ स्थान **हिंदुस्थान** होय. ह्या देशांत अनेक **योगी** होऊन गेले. योगविद्या ही चमत्कार करून दाखविते, परंतु तिचा खरा हेतु आत्मा व परमेश्वर ह्यांचें स्वरूप ओळखणें हाच होय. ह्याप्रमाणें आपल्या ठिकाणीं असणाऱ्या बुद्धीचा उपयोग '**भौतिक**' व '**आध्यात्मिक**' असा दोन प्रकारचा करितां येतो.

५

**शोधांचा उपयोग** —संशोधकांनीं लाविलेल्या '**भौतिक**' शोधांच्या-मुळें आज आपण अनेक सुखसोयी उपभोगीत आहों. ह्या भौतिक शोधांचा हेतु मनुष्याच्या **सुखाची वाढ** करणें हाच मुख्यतः असतो हें जरी खरें असलें, तरी कित्येक वेळीं ह्या शोधांचा उपयोग **मनुष्याचा नाश** करण्याकडे होतो ! असें जरी असलें तरी ह्याचा दोष त्या शास्त्रज्ञां-कडे देणें योग्य होणार नाहीं. कारण **लोकसेवा** हाच त्यांचा हेतु असतो व त्यासाठीं वेळप्रसंगीं ते आपल्या स्वतःच्या प्राणाची सुद्धां पर्वा करीत नाहींत असें दिसून येतें !

ह्या शास्त्रज्ञांचे शोध पंचमहाभूतांसंबंधीं असतात हें आपण पाहिलेंच आहे. हीं पंचमहाभूतें आपल्या इंद्रियांना समजणारीं आहेत, पण मनुष्याचा **आत्मा** अगर परमेश्वरस्वरूप हीं ओळखणें अत्यंत कठीण आहे. ज्यांना शक्य आहे ते ह्या कार्यासाठीं **योगमार्ग** स्वीकारितात; कांहींजण **भक्तिमार्गाकडे** जातात, तर कांहीं संसारांतच राहून आप-आपलें कर्म करीत **लोकसेवे**च्या मार्गाकडे वळतात.

कोणी कोणत्याही मार्गाकडे वळो, परंतु ह्या **प्रत्येकाचा हेतु ईश्वरी सामर्थ्याची अगर त्याच्या लीलेची ओळख करून घेणें** हा असतो. एखादा संशोधक शोध करीत असतांना एखादी क्रिया कां घडली ह्याचें कारण त्याला कळलें नाहीं म्हणजे तो त्या क्रियेचा संबंध **'ईथर'** नांवाच्या एका तत्त्वाकडे लावितो, आणि हा ईथर सर्वत्र भरलेला असून त्याचे सर्व गुणधर्म अजून कळलेले नाहींत, असें तो म्हणतो! भक्तिमार्ग अगर कर्ममार्ग ह्यांत जे कोणी असतात, ते एखादी विशेष घटना पाहातांच तिचा संबंध **'ईश्वराकडे'** लावितात व ईश्वरही सर्वत्र भरलेला आहे असें म्हणतात, हें साम्य विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

६

**मनुष्याचें ध्येय—मनुष्यजन्म** वारंवार मिळत नाहीं अशी हिंदु-धर्मीयांची कल्पना आहे. फार मोठ्या पुण्यकारक गोष्टींचें मोल देऊन हा देह प्राप्त होतो असें ते समजतात. पूर्वजन्मासंबंधाच्या कल्पना निरनिराळ्या धर्मांत निरनिराळ्या दिसून येतात. पण मरणानंतर मिळणाऱ्या गतीसंबंधीं मुख्य मुख्य धर्मांत बरेंचसें एकमत दिसून येतें. धर्मशील हिंदू **मोक्षप्राप्तीची** इच्छा करितो. प्रत्येक मुसलमान **खुदाच्या कृपेसाठीं** झटत असतो. तर प्रत्येक ख्रिस्ती मनुष्याची इच्छा अशी असते कीं **क्षमा मागितल्यानें आपला येशू आपलें तारण करील!** म्हणजे मरणानंतर चांगली गति मिळावी अशीच प्रत्येकाची

इच्छा असते. **पूर्वजन्म** व **मरणानंतरची गति** हे मुद्दे आपण बाजूस ठेवूं. पण निदान **ह्या जन्मांतील आपलें कांहीं कर्तव्य** आहे कीं नाहीं ह्याचा विचार आपण केला पाहिजे.

आपल्याला आपल्या बुद्धीचा उपयोग स्वतःच्या इच्छेप्रमाणें करितां येतो. जे **संशोधक** असतात ते मनुष्यप्राण्याच्या **सुखांत भर** घालण्याकरितां आपल्या बुद्धीचा उपयोग करितात व जे **संतजन** असतात ते **जनसेवा** करितांना दिसतात. ह्या दोघांना स्वतःचा संसार नसतो असें नाहीं. पण ते आपापल्या कार्यांत इतके तल्लीन होऊन गेलेले असतात कीं जगाच्या दृष्टीनें ते जणूं काय वेडेच ठरतात! कोणी एक संशोधक होऊन गेला, त्याला एके प्रसंगीं स्वतःच्या वस्त्राची सुद्धां आठवण राहिली नाहीं! दुसरा एकजण होऊन गेला त्याला कित्येक गोष्टींची आठवण नसे! संतांचा प्रकार असाच दिसून येतो. **कबीराचे शेले अर्धवट** राहात आणि मग ते परमेश्वराला पुरे करावे लागत! **जनाबाईचें दळण** तसेंच राही आणि त्याची जबाबदारी मग परमेश्वरावरच पडे! **तुकारामाला मिळालेले ऊंस** वाटेंतच खपून जात आणि मग ही गोष्ट त्याच्या लक्षांत येई!

परंतु अशा प्रकारें संशोधक अगर संतजन होऊन सर्व जगाची काळजी घेणें प्रत्येकाला शक्य नाहीं. कारण संसारांत स्वार्थ पाहाण्याकडेच बुद्धीचा उपयोग करणारे फार असतात! 'संसार' करणें ह्यांत वाईट कांहींच नाहीं. तो करूं नये असा सृष्टीचाही हेतु नाहीं. **'जो संसार उत्तम प्रकारें करील त्याला परमेश्वरप्राप्तीचा हक्क प्राप्त होईल'** असें **रामदासस्वामी** म्हणतात. स्वतः रामदास संसारी नव्हते, परंतु मनुष्यमात्राचा ओढा प्रपंचाकडे असतो हें पाहून त्यांनीं विचारपूर्वक हा मार्ग सुचविलेला दिसतो. तेव्हां **संसार करीत असतां लोकसेवा व तिच्या योगानें परमेश्वरप्राप्ति ह्या मार्गानें जाऊन आपल्याला आपलें 'मुक्त होणें' हें ध्येय साधितां येईल.**

७

**व्यक्ति व समाज**—संसारांत राहून **लोकसेवा** करीत आपल्याला आपलें ध्येय साधितां येईल हें आपण पाहिलें. पण आतां संसार करणाऱ्या प्रापंचिक मनुष्यांकडे पाहा. त्यांच्यामध्यें सारखी चढाओढ लागलेली दिसते! जो तो सुखासाठीं धडपडतो आहे! प्रत्येकाला सुख मिळावें हा सृष्टीचा हेतु आहे; परंतु ह्या सुखाला कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं व सुख म्हणजे तरी काय? '**सुख म्हणजे मनाला आनंद वाटणें**' असा जरी सामान्य अर्थ आपण धरिला, तरी ह्या सुखाला कांहींतरी बंधन नको काय?

**व्यक्ति** व तिचें सुख ह्या सर्वांचा संबंध शेवटीं **समाजाशीं** जाऊन पोहोंचतो. कारण समाज हा व्यक्तीव्यक्तींनीं बनलेला असतो. एकाच होडींत बसलेले खलाशी जर एखादी होडी वल्हवीत असले, तर त्या सर्वांचा मिळून कांहींतरी एकच परिणाम त्या होडीवर दिसून येतो. जर ते खलाशी परस्परांशीं सहकार्य करून एकाच दिशेनें होडी वल्हवीत असतील, तर त्यांचें तें कार्य परस्परांना उपकारकच ठरेल; ह्याचप्रमाणें **समाज योग्य त्या ध्येयाकडे जाण्यासाठीं तरी प्रत्येक व्यक्तीवर कांहींतरी बंधन हें असावेंच लागतें.**

कोणतीही व्यक्ति ह्या बंधनांत राहून आपापल्यापुरतें कार्य करील; परंतु सर्व मनुष्यजातीचें कल्याण म्हणून समाजकार्य चालविणें ही अत्यंत थोर दृष्टि होय. **सर्व जनता हें परमेश्वराचें स्वरूप आहे ही वृत्ति फक्त महात्म्यांच्याच ठिकाणीं दिसून येते.** सामान्य मनुष्य आपल्या स्वत:पुरता पाहातो. समाज अगर सर्व मनुष्यजात ह्या गोष्टी बहुधा त्याच्या ध्यानींमनींही नसतात!

समाजांत व्यक्तीच्या स्वार्थाला गौण स्थान असावें लागतें. **समाज, देश** किंवा **मनुष्यजात** ह्यांच्यासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करणें हें सर्वांत श्रेष्ठ कार्य होय व ह्या कार्यासाठीं झटणारे पुरुषच

खरोखर थोर पदाला चढतात. **गुलामगिरीची चाल नष्ट करूं पाहा-णारा आब्राहम लिंकन, व्याधींनीं ग्रस्त झालेल्या लोकांची सेवा करणारा फादर डेमियन्, सर्वांनाच अंगभर वस्त्र आणि पोटभर अन्न मिळविण्याकरितां झटणारे महात्मा गांधी अगर लोकमान्य टिळक, हे व अशाच प्रकारचे पुरुष खरोखर महात्मा ह्या पदाला योग्य ठरतात.**

## ८

**धर्म व नीति**—कोणताही समाज पुढें नेला जावा, एकमेकांच्या स्वार्थानें त्याची घडी विसकटूं नये, म्हणून जीं कांहीं बंधनें असावीं लागतात त्यांना आपण '**नीतिबंधनें**' म्हणूं या. तसेंच समाजाच्या धारणपोषणासाठीं जे आचारविचार काळजीपूर्वक ठरविण्यांत आले आहेत त्यांना आपण थोडक्यांत '**धर्म**' असें म्हणूं या. ह्याप्रमाणें '**धर्म** व **नीति**' हीं पुष्कळ अंशीं एकरूप अशीं आहेत असें म्हणण्याला हरकत नाहीं.

जगांत जरी निरनिराळे धर्म चालू असले आणि त्यामुळें निरनिराळ्या धर्मांतील व्यक्तींच्या आचारविचारांत फरक दिसत असला, तरी सर्व धर्मांत कांहीं कांहीं कल्पना, आचार व विचार सारखेच दिसून येतात; त्याचप्रमाणें पुष्कळशीं नीतितत्त्वेंही सगळीकडे सारखींच दिसून येतात. **दुसऱ्याच्या द्रव्याचें हरण करूं नये, असत्य बोलूं नये, उपकार करावा** वगैरेसारख्या अनेक गोष्टींत सर्व धर्मांचें एकमत आहे. परिस्थितीप्रमाणें निरनिराळ्या धर्मांत कांहींकांहीं आचारविचार निराळे दिसतील, म्हणून तेवढ्यानें **अमुक धर्म चांगला, अमुक वाईट असें म्हणून चालणार नाहीं.**

धर्म कोणता कां असेना, त्यामुळें व्यक्तीच्या उत्कर्षाला योग्य तो वाव राहिला पाहिजे. नीति अगर धर्म ह्यांनीं व्यक्तीवर जरूर तितकें

बंधन पडण्यास हरकत नाहीं, पण ह्यामुळें व्यक्तीचा जिवंतपणा जातां कामा नये. **धर्म व नीति हीं मनुष्याला जीवनाप्रमाणें होत.** हें जीवन, सांचलेल्या स्थितींत न राहातां तें अखंड वाहात राहिलें पाहिजे. नद्या ज्याप्रमाणें शेवटीं समुद्राला मिळतात, त्याप्रमाणें कोणत्याही धर्मांत असलेला मनुष्य शेवटीं आपल्या ध्येयाला जाऊन मिळाला पाहिजे.

९

**संस्कृति म्हणजे काय?—धर्म** व **नीति** म्हणजे काय व त्यांचा परस्परसंबंध काय आहे हें आपण थोडक्यांत पाहिलें. नीतिविषयक कल्पना, विचार व आचार ह्यांच्यावर उभारली गेलेली मनुष्यजातीची जी एकंदर सुधारणा, तिला आपण '**संस्कृति**' असें सामान्य अर्थानें म्हणूं या. धर्म अगर नीतिविषयक कल्पनांचा उदय निरनिराळ्या स्थळीं व निरनिराळ्या काळीं झालेला असल्यामुळें **सर्व धर्म अगर संस्कृति समकालीन म्हणजे एकाच काळांतील नाहींत.**

आज जगांत **हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध, जैन, शीख** व **पारशी** हे धर्म दिसून येतात. ह्यांपैकीं हिंदु, बौद्ध, जैन व शीख हे हिंदुस्थानांतील असून बाकीचे ह्या देशांत दुसरीकडून आलेले आहेत. मुसलमानी धर्म अरबस्थानांतून ह्या देशांत आला; ख्रिस्ती धर्म पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज ह्यांनीं सोळाव्या शतकाच्या अखेरीअखेरीस इकडे आणिला; व पारशी धर्म इराणांतून जेव्हां पारशी लोक आश्रयाकरितां इकडे आले तेव्हां ह्या देशांत आला. आज हे **सर्व धर्म हिंदुस्थानांत नांदत असल्याचें दिसून येतें.**

सर्व धर्मांत हिंदुधर्म फार प्राचीन आहे. तो केव्हां सुरू झाला ह्याचा इतिहासाला बरोबरसा पत्ता नाहीं! हिंदु लोक त्याला '**सनातन धर्म**' म्हणतात; हिंदूंचे मुख्य धर्मग्रंथ '**वेद**' म्हणून त्याला '**वैदिक धर्म**' असेंही म्हणतात; भगवंतानें तो उपदेशिला म्हणून

त्याला **'भागवत धर्म'** म्हणतात व तो आर्यांचा आहे म्हणून त्याला **'आर्य धर्म'** असेंही म्हणतात. हिंदुधर्मानंतर कित्येक वर्षांनीं 'खिस्ती' धर्म येशू खिस्तानें प्रस्थापिला, त्याला आतां एकोणीस शतकें झालीं. 'मुसलमानी' धर्म महंमद पैगंबरानें उपदेशून तेरा शतकें झालीं. बौद्धधर्म व जैनधर्म मुसलमानी धर्मापेक्षां जुने असून त्यांच्या सुरुवातीला दोन हजारांपेक्षां अधिक वर्षें होऊन गेलीं.

ह्याप्रमाणें हिंदुधर्माशीं समकालीन असा एकही धर्म नसल्यानें हिंदु संस्कृतीइतकी प्राचीन संस्कृति निदान आज तरी दुसरी नाहीं ! ही **हिंदु संस्कृति एके काळीं सयाम, ईस्ट इंडीज बेटें, मलाया, इकडेही जाऊन पोहोंचली होती.** अशा ह्या हिंदु संस्कृतीचा थोडासा इतिहास आपण पाहूं या.

## १०

**हिंदु संस्कृतीचा इतिहास**—हिंदु संस्कृतीची एकंदर परंपरा हिंदूंचे **वेद**, त्यांचीं **पुराणें** व **इतिहास** ह्यांवरून पाहातां येते. आपण ही परंपरा **वेदकालापासून** थोडक्यांत पाहूं या.

**ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद** व **अथर्ववेद** असे आर्यांचे चार वेद आहेत. वेदांची उत्पत्ति कमींत कमी पस्तीसशें वर्षांपूर्वीं झाली असें कोणी समजतात, तर ते अत्यंत प्राचीन काळीं प्रत्यक्ष परमेश्वरानें ऋषींना सांगितले असें कोणी म्हणतात. कांहींही असलें तरी **वेदांचे उपासक आर्य हेच होत.** ह्या **वेदांशिवाय ब्राह्मणें, आरण्यकें** व **उपनिषदें** असे आर्यांचे ग्रंथ आहेत. चार वेद व हे सर्व ग्रंथ ह्यांना **'श्रुति'** असेंही म्हणतात. 'श्रुति' हे आर्यांचे मुख्यतः विचार अगर उपासना-ग्रंथ होत. आर्यांचे आचारग्रंथही आहेत, त्यांना **'स्मृति'** हें नांव आहे. **श्रुति व स्मृति ह्यांवरून त्या काळच्या आर्यांचे विचार व आचार समजून येतात.**

वेदकालीन आर्य पंचमहाभूतांची **उपासना** करीत. त्या काळीं यज्ञयाग होत. यज्ञाचे वेळीं **सोमरसाचें पान** व **मांसभक्षण** होई. **वर्णाश्रमव्यवस्था** अगर **जातिभेद** आरंभीं नव्हते. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाही **शिक्षण** मिळे! आर्य लोक **शेती** व **गोपालन** करीत. त्यांना **वस्त्रें विणतां** येत. त्यांना **धनुर्विद्या** अवगत होती. ते वाहनाकरितां **गाड्या** व **रथ** ह्यांचा उपयोग करीत.

ह्या वेदकालानंतर महत्त्वाचा काल '**पुराणकाल**' होय. इसवी सनाचे पूर्वी एक हजार वर्षांचे सुमारास ह्या काळाचा साधारणपणें मध्य होता. ह्या काळांत '**रामायण**' व '**महाभारत**' ह्यांची रचना झाली. रामायण **वाल्मीकीनें** व महाभारत **व्यासानें** रचिलें. ह्याच कालांत **भगवंतानें अर्जुनाला** '**गीता**' उपदेशिली. सर्व पुराणें व गीता हीं आर्यांच्या संस्कृत भाषेंत आहेत.

पुराणकालांत **वर्णाश्रमव्यवस्था** व **जातिभेद** चांगल्या प्रकारें सुरू झालेले होते. ज्ञान, युद्ध, व्यापार व सेवा ह्यांसाठीं अनुक्रमें **ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य** व **शूद्र** असे चार वर्ण मानलेले होते. त्या काळीं '**शतायुर्वै पुरुषः**' म्हणजे मनुष्याला शंभर वर्षांचें आयुष्य समजत. ह्या आयुष्याचे चार विभाग करून त्यांना '**आश्रम**' असें म्हणत. ह्या आश्रमांना अनुक्रमें **ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ** व **संन्यास** अशीं नांवें देण्यांत आलीं होतीं. ह्या प्रत्येक आश्रमांतील मनुष्याचीं कर्तव्यें निरनिराळीं असत. जातिभेद सुरू झाले होते. **यज्ञयाग** चालूच होते. स्त्रियांना **शिक्षण** देण्यांत येई व त्यांना **स्वयंवर** करण्याची परवानगी असे. **कुलगुरूंची** पद्धति चालू होती. वेळोवेळीं विद्वान् लोक एकत्र जमून चर्चा करीत. **युद्धशास्त्राचा** उत्कर्ष चांगला झाला होता. एकंदरींत त्या काळच्या आर्यांचे धार्मिक विचार व आचार ह्यांत थोडासा फरक पडलेला दिसत असला तरी त्या काळीं आर्यधर्म व संस्कृति ह्यांचा चांगला उत्कर्ष झालेला दिसून येतो.

## ११

**हिंदु संस्कृतीचा इतर धर्मांशीं आलेला संबंध**—हिंदुस्थानांत **बौद्ध व जैन** हे धर्म इ. स. पूर्वी पांचशेंच्या सुमाराला चालू झाले. ह्या धर्मांशीं आर्यांच्या धर्माचा पहिला संबंध आला; बौद्धधर्मापूर्वी आर्य अथवा हिंदुधर्मात **यज्ञयाग ह्यांचा अतिरेक** झाला होता व जातिभेद हा जन्मावरून कडकपणें पाळण्यांत येऊं लागला होता. **गौतम बुद्धानें** मुख्यतः ह्या दोहोंवरच हल्ला चढविला. **मोक्ष मिळणें हें दया, प्रेम, अहिंसा वगैरे चांगल्या वृत्तींवर अवलंबून आहे व वर्ण-व्यवस्था अगर जातिभेद हें निव्वळ कर्मठपणाचें ढोंग आहे,** ह्या स्वरूपाचे विचार गौतम बुद्धानें मांडण्यास सुरुवात केली व त्याचे हे विचार अनेक हिंदुधर्मीयांना आवडून ते भराभर बौद्धधर्माला जाऊन मिळाले. **बौद्ध व जैन** हे धर्म बरेचसे परस्परांशीं जुळते असल्यामुळें जैन धर्माचा निराळा विचार करण्याचें कारण नाहीं.

ह्या बौद्ध धर्माचा परिणाम हिंदुधर्म व हिंदु संस्कृति ह्यांवर बराचसा घडला. इतका कीं, **अशोक, हर्षवर्धन** वगैरे पुष्कळशा हिंदुराजांनींही तो धर्म स्वीकारिला व त्याच्या प्रसाराची योग्य ती व्यवस्था केली. पण ह्या काळांत **श्रीमत् शंकराचार्य** ह्यांचा उदय झाला. त्यांनीं आपल्या विद्वत्तेच्या जोरावर बोद्धधर्मीय पंडितांचा वादामध्यें पराभव केला व **बौद्धधर्म हिंदुधर्माहून निराळा नाहीं** असें दाखवून दिलें. तरीपण हिंदुधर्मीयांचे **विचार** व **आचार** ह्यांचेवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. **यज्ञयागांचा अतिरेक** थांबला व **संन्यासवृत्ति** बळावली. **सद्वर्तन, भूतदया** व **अहिंसा** हीं **मुक्ति** मिळण्यास पुरेशीं आहेत हें मान्य करण्यांत आलें. **कर्मठपणा** कमी होऊन **भक्तीवर** जोर देण्यांत येऊं लागला. म्हणजे हिंदुधर्मातील ज्या गोष्टींचा अतिरेक बहुजनसमाजाला आवडत नव्हता, त्या गोष्टींचा अतिरेक थांबविण्यांत

येऊन बौद्धधर्मांतील जे आचार-विचार सामान्य लोकांना प्रिय होऊं पाहात होते त्यांचा स्वीकार हिंदुधर्मांत करण्यांत आला.

ह्यानंतर इ. स. एक हजारपासून पुढें कित्येक शतकें **हिंदुधर्माचा मुसलमान धर्माशीं संबंध आला.** हिंदुस्थानची राजसत्ता कित्येक वर्षें मुसलमान राजांच्या हातीं होती, ह्यामुळें कित्येक हिंदूंनीं मुसलमान राज्यकर्त्यांची सेवावृत्ति पतकरली. मुसलमानी **शब्द** व **रीतरिवाज** कमीजास्त प्रमाणांत हिंदूंनीं स्वीकारिले. पोषाखाची धर्त बदलली व थोडाबहुत **'गोषा'** सुरू झाला. ह्या काळांत कित्येक **रजपूत** व **मराठे** राजे उदयाला आले व त्यांनीं हिंदुधर्माला चांगला आधार दिला. ह्याच काळांत हिंदु **साधुसंतही** होऊन गेले व त्यांनीं सोप्या **भक्तिमार्गाचें** महत्त्व लोकांना पटवून दिलें.

ह्यानंतर हिंदुधर्माचा संबंध **'ख्रिस्ती'** धर्माशीं आला. इसवी सनाच्या सोळाव्या—सतराव्या शतकांत **पोर्तुगीज, फ्रेंच** व **इंग्रज** लोक ह्या देशांत व्यापाराकरितां आले. शेवटीं इकडे इंग्रजांचें राज्य स्थापन झालें! ह्या इंग्रजी राजसत्तेचा परिणाम हिंदूंचे आचार व विचार ह्यांवर फार झालेला असल्यामुळें त्याचा विचार स्वतंत्रपणें केला पाहिजे.

## १२

**आजचा हिंदुधर्म**—इंग्रजी राज्यांत **धर्माचे बाबतींत प्रत्येकाला स्वातंत्र्य** आहे. इंग्रजी राजसत्तेमुळें आपला संबंध **इंग्रजी विद्या** व **इंग्रजी संस्कृति** ह्यांशीं आला; तसेंच अनेक गोष्टींमुळें आपला सर्व जगाशीं संबंध आला व त्यामुळें आपले धर्मविषयक आचार व विचार ह्यांत फारच मोठी क्रान्ति झाली!

हल्लीं यज्ञयाग फारसे होत नाहींत, आश्रमसंस्था नीट पाळली जात नाहीं, आणि वर्णव्यवस्था नांवापुरती राहिली आहे! जातिभेद कायम आहेत, पण रोटीबेटीसंबंधांत सैलपणा येत आहे. कुलगुरूंची

पद्धति कशीतरी चालू आहे. विद्येची मोकळीक सर्वांना आहे. स्त्रियांना विद्या शिकविण्यांत येते, पण स्वयंवरपद्धति बंद दिसते. बालविवाह चालू नाहीं. **परदेशगमन वर्ज्य नाहीं.** भक्तिमार्गाकडे जास्त कल आहे. **वेद, पुराणें** व **गीता** ह्यांना मान दिला जातो, पण त्या बाबतींत **चिकित्साबुद्धि** दिसून येते. मूर्तिपूजा चालू आहे. ह्या व अशाच प्रकारच्या अनेक गोष्टी पाहिल्या म्हणजे वेदकालीन **आर्य संस्कृतीच्या स्वरूपामध्यें पुष्कळ बदल झाला आहे,** असें स्पष्ट दिसतें.

ह्या बदल होण्याचें कारण आपल्या **धर्म** व **संस्कृतिविषयक कल्पना** व **विचार** बदलत आहेत हें होय. असा बदल होणें अनिष्ट होय असें ज्या कांहीं जणांचें मत आहे त्यांना '**सनातनी**' म्हणतात. 'धर्मविषयक कल्पना', आचार व विचार हे बदलणारच, पण ते योग्य प्रकारें बदलले पाहिजेत' असें म्हणणारे जे कोणी आहेत त्यांना '**सुधारक**' असें म्हटलें जातें. 'धर्म व देव ह्यांना न मानणारा' तिसराही एक वर्ग आहे, त्यांना '**नास्तिक**' असें म्हणतात. म्हणजे सनातनी व नास्तिक हीं विचारांचीं दोन टोकें समजल्यास 'सुधारक' हा मध्यबिंदु होय! ह्या मध्यबिंदूकडे बाकीचे दोन वर्ग कळत वा न कळत खेंचले जात आहेत असें दिसून येतें!

इंग्रजी विद्येमुळें आपली **श्रद्धेकडून विचाराकडे** गति सुरू झाली व त्यामुळें पूर्वींचीं धर्मबंधनें आपोआप सैल होऊं लागलीं. '**हरिजन** हे आपले **धर्मबांधव** आहेत, त्यांस दूर लोटून चालावयाचें नाहीं' व '**परधर्मांत गेलेला मनुष्य शुद्ध करून घेतां येतो**' अशा प्रकारच्या गोष्टींवरून आपल्या धर्मविषयक कल्पना बदलत चालल्या आहेत असें दिसून येतें.

ह्याप्रमाणें धर्मविषयक आचार व विचार ह्यांत परिस्थितीप्रमाणें योग्य तो बदल होणारा असला, तरी **धर्माच्या मूलभूत कल्पनांचें रक्षण**

**हें झालेंच पाहिजे.** परमेश्वर, आई, बाप, गुरु, स्वदेश, स्वधर्म, ह्यांचे-विषयीं पूज्यबुद्धि व मनाचा पवित्रपणा ह्यांना धक्का लागणें केव्हांही बरें नव्हे. तसेंच धर्म कोणता कां असेना, त्याचें अतिक्रमण दुसऱ्यावर होतां कामा नये. सर्व मानवजाति ही एक आहे व 'मनुष्य' म्हणून सर्वांनाच कांहीं बंधनें आहेत. तेव्हां **'माझा धर्म' ह्या संकुचित क्षेत्रांतून आपण 'मानवधर्म' ह्या विशाल क्षेत्राकडे निदान नजर तरी टाकण्याचा प्रयत्न करून पाहिला पाहिजे.**

---

# पाठान्तर

## (१)

## श्रीकृष्ण—प्रार्थना

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनंतरूपम् ॥ १ ॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥ २ ॥

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ ३ ॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वाऽपि ॥ ४ ॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ५ ॥

पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः ॥६॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियाः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥७॥

किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ८ ॥

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसंघाः ॥९॥

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।
अनंत देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ १० ॥

(२)

## गीता — अध्याय १५ वा

पुरुषोत्तमनाम ।

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १ ॥

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा
गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।
अधश्च मूलान्यनुसंततानि
कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ॥ २ ॥

न रूपमस्येह तथोपलभ्यते
नान्तो न चादिर्न च संप्रतिष्ठा ।
अश्वत्थमेनं सुविरूढमूल-
मसंगशस्त्रेण दृढेन छित्वा ॥ ३ ॥

ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन्गता न निवर्तंति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥

निर्मानमोहा जितसंगदोषा
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञै-
र्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥

न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।
मनः षष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।
गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥ ८ ॥

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।
अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥
उत्क्रामन्तं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् ।
विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ॥ १० ॥
यतंतो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् ॥
यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः ॥ ११ ॥
यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ १२ ॥
गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ।
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥ १३ ॥
अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १४ ॥
सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो
वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५ ॥
द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥
यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥
यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥
इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।
एतद्बुध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ २० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरुषोत्तमयोगो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

वा. वा.
११५५७
३-१३।५७

(३)

## दासबोध — दशक १४ वा

### समास ७ वा – युगधर्मनिरूपणनाम. ( संक्षेप करून )

नाना वेष नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम ॥
जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥ १ ॥

देव ऋषी मुनी योगी । नाना तापसी वीतरागी ॥
पितृ आदि करून विभागी । अतीत अभ्यागत ॥ २ ॥

याकारणें गृहस्थाश्रम । सकळामध्यें उत्तमोत्तम ॥
परंतु पाहिजे स्वधर्म । आणी भूतदया ॥ ३ ॥

जेथें षट्कर्मै चालती । विध्युक्त क्रिया आचरती ॥
वाग्माधुर्यें बोलती । प्राणीमात्रांसी ॥ ४ ॥

सर्वप्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहीं एक ॥
त्याहीमध्यें अलौकिक । तो हा भक्तिमार्ग ॥ ५ ॥

ऐसा भगवंताचा भक्त । विशेष अंतरीं विरक्त ॥
संसार सोडून झाला मुक्त । देवाकारणें ॥ ६ ॥

अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य ॥
लोलंगतेयेवढें अभाग्य । आणीक नाहीं ॥ ७ ॥

राजे राज्य सांडून गेले । भगवंताकारणें हिंडले ॥
कीर्तिरूपें पावन झाले । भूमंडळीं ॥ ८ ॥

ऐसा जो कां योगेश्वर । अंतरीं प्रत्ययाचा विचार ॥
उकलूं जाणे अंतर । प्राणिमात्रांचें ॥ ९ ॥

ऐसी वृत्ति उदासीन । त्याहिवरी विशेष आत्मज्ञान ॥
दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ॥ १० ॥

बहुतांसी करी उपाय । तो जनाच्या वांट्या न ये ॥
अखंड जयाचें हृदय । भगवद्रूप ॥ ११ ॥

जनास दिसे हा दुश्चित । परी तो आहे सावाचित ॥
अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं ॥ १२ ॥

प्रचीतीविण जें ज्ञान । तो अवघाचि अनुमान ॥
तेथें कैंचें परत्रसाधन । प्राणीयांसी ॥ १३ ॥

याकारणें मुख्य प्रत्यय । प्रचीतीविण कामा न ये ।
उपायासारिखा अपाय । शाहाणे जाणती ॥ १४ ॥

वेडें संसार सांडून गेलें । तरी तें कष्टकष्टोंचि मेलें ॥
दोहींकडे अंतरलें । इहलोक परत्रीं ॥ १५ ॥

संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला ॥
तेणें जन पावन केला । आपणऐसा ॥ १६ ॥

जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे ॥
तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ॥ १७ ॥

(४)

## आरती — श्रीदत्तात्रेयाची



त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्य-राणा । नेति नेति शब्दें न ये अनुमाना । सुरवर-मुनिजन-योगिसमाधि न ये ध्याना ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय श्रीगुरु-

दत्ता। आरति ओंवाळितां हरली भवचिंता ॥ ध्रु० ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त। अभाग्यासी कैंची न कळे ही मात ॥ पराही परतली कैंचा हा हेत। जन्ममरणाचाही पुरलासे अंत ॥ जय० ॥ २ ॥ दत्त येऊनीयां उभा ठाकला। साष्टांगनमनें प्रणिपात केला। प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला। जन्ममरणाचा वा फेरा वांचविला ॥ जय० ॥ ३ ॥ दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान। हारपलें मन झालें उन्मन। मीतूंपणाची झाली बोळवण। एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥ जय० ॥ ४ ॥

(५)

## राष्ट्रगीतें

### वन्दे मातरम्।

सुजलां सुफलां मलयजशीतलां सस्यश्यामलां मातरम् ॥
शुभ्रज्योत्स्नापुलकितयामिनीं फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीं सुमधुरभाषिणीं सुखदां वरदां मातरम् ॥ वन्दे० ॥ १ ॥

### (वैदिक)

सहनाववतु सह नौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै।
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै।
सर्वे वै सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥

ॐ शान्तिः शान्तिः ...

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
...60.40 नों. दि
IRBK-0104057